सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १४० पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वैष्णोदेवी यात्रेला निघालेली बस 30 फूट खोल दरीत कोसळली, एकाच जागीच मृत्यू

जम्मू-काश्मीर : जम्मू-पठाणकोट राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी सकाळी भीषण अपघात घडला. सांबा जिल्ह्यातील जटवाल परिसरात प्रवासी बस नियंत्रण सुटल्याने थेट खड्ड्यात जाऊन कोसळली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर ४० पेक्षा जास्त प्रवासी गंभीररीत्या जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही खासगी बस कठुआ येथून पवित्र कटरा शहराकडे भाविकांना घेऊन निघाली होती. प्रवासादरम्यान अचानक चालकाचा ताबा सुटला आणि बस रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल खड्ड्यात जाऊन आदळली. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी बचावकार्य सुरू केले, तर पोलिसांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले.

टायर फुटून बस ३० फूट खोल दरीत

सांबा जिल्ह्यातील जटवाल परिसरात प्रवासी बसचा टायर अचानक फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटताच बस महामार्गावरून खाली घसरली आणि थेट पुलाखालच्या ३० फूट खोल कोरड्या कालव्यात कोसळली. या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला असून ४० हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. सर्व प्रवासी उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. हे भाविक माता वैष्णो देवीच्या दर्शनासाठी कटरा येथे जात असताना ही दुर्घटना घडली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस व स्थानिक प्रशासनाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून गंभीर जखमींना अधिक उपचारासाठी जम्मू मेडिकल कॉलेजमध्ये हलविण्यात आले आहे.

अपघाताबद्दल तीव्र दुःख, मदतीचे आश्वासन : मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी जटवाल परिसरातील बस अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. माता वैष्णोदेवीच्या यात्रेसाठी निघालेल्या भाविकांवर ही दुर्घटना ओढवल्याने त्यांनी संवेदना व्यक्त करताना म्हटले की, या अपघातामुळे झालेली जीवितहानी अतिशय दुर्दैवी आहे. मुख्यमंत्र्यांनी जखमी यात्रेकरूंच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली असून, अपघातग्रस्तांना आवश्यक ती सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. राज्य सरकारच्या वतीने मदत आणि उपचारासाठी पूर्णपणे सहकार्य केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

अपघातग्रस्तांना स्थानिकांचा जीव वाचविण्यासाठी धडपड

जम्मू-पठाणकोट महामार्गावर झालेल्या भीषण अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्यात सहभाग घेतला. घटनास्थळी प्रथम पोहोचलेल्या लोकांनी जखमींना बसमधून बाहेर काढण्यास सुरुवात केली. प्रवाशांमध्ये मुले आणि महिलांचाही समावेश असल्याने परिस्थिती अधिक गंभीर होती. स्थानिकांनी धाडस दाखवत अडकलेल्यांना बाहेर काढले आणि तातडीने रुग्णालयात हलविण्याची व्यवस्था केली. यापैकी ८ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे.

## संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा समारोप

### लोकसभेत १२ तर राज्यसभेत १५ विधेयके मंजूर



नवी दिल्ली : महिनाभर चाललेल्या अधिवेशनात लोकसभेने १२ आणि राज्यसभेने १५ विधेयके मंजूर केली. वारंवार व्यत्यय, तहकूब आणि बहिष्कार सत्र सुरूच राहिले. शेवटच्या दिवसाच्या कामकाजादरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, सभागृहात १२० तासांच्या चर्चेचा वेळ निश्चित करण्यात आला होता, त्यामुळे केवळ ३७ तासांची चर्चा होऊ शकली. यामुळे लोकसभा अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आली.

२१ जुलै रोजी हे अधिवेशन सुरू झाले. दोन्ही सभागृहांमध्ये ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेव्यतिरिक्त, या अधिवेशनात फारच कमी काम झाले.

लोकसभेत फक्त ५५ प्रश्नांची उत्तरे देण्यात आली

अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की या अधिवेशनात ४१९ प्रश्न विचारण्यात आले. त्यापैकी ५५ प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. विरोधी पक्षाचे खासदार बिहार एसआयआरवर चर्चेची मागणी करत राहिले. त्यांच्या विरोधामुळे आणि गदारोळामुळे शेवटच्या दिवशीही दोन्ही सभागृहात कामकाज होऊ शकले नाही. लोकसभेचे कामकाज दुपारी १२ वाजता पुन्हा सुरू झाले. पंतप्रधान मोदी देखील सभागृहात पोहोचले. दरम्यान, विरोधकांनी एसआयआर मुद्द्यावर चर्चेची मागणी केली आणि गोंधळ घातला. सभागृहात राष्ट्रगीत वाजवण्यात आले, त्यानंतर सभागृह अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले.

## जि.प.व पंचायत समिती अंतिम प्रभाग रचना उद्या प्रसिध्द होणार

अहिल्यानगर, दि. २२ - ग्रामविकास विभागाच्या आदेशान्वये व विभागीय आयुक्त नाशिक यांच्या मान्यतेनुसार अहिल्यानगर जिल्हा परिषद व पंचायत समितीची अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे. शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेली ही रचना उद्या (२२ ऑगस्ट) रोजी प्रसिद्ध होणार आहे.

या अंतिम प्रभाग रचनेची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील सूचना फलक, संकेतस्थळ, जिल्हा परिषद कार्यालय, संबंधित तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ग्रामविकास विभागाच्या १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार दि.२२ ऑगस्ट २०२५ रोजी शासन राजपत्रान्वये ही रचना प्रसिद्ध होणार असल्याचे उपजिल्हाधिकारी महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

## ऑगस्ट महिन्याचा पगार ५ दिवस आधीच मिळणार! गणेशोत्सवानिमित्त सरकारी नोकरदारांना खुशखबर



मुंबई : सध्या राज्यभरात काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या तयारीची लगबग पाहायला मिळत आहे. दहा दिवसीय या उत्सवाची धूम आणि चकरमान्यांचा उत्साह लक्षात घेता, राज्य सरकारने राज्यातील शासकिय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्ती वेतनधारक यांच्यासाठी मोठी घोषणा केली आहे. खास गणेशोत्सवानिमित्त ऑगस्ट महिन्याचा पगार ५ दिवस आधीच बँक खात्यात जमा केला जाणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन २६ ऑगस्ट रोजीच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. महाराष्ट्रभर गणेशोत्सव खूप थाटामाटात साजरा केला जातो. या उत्सवाची धामधूम मोठी असल्याकारणांमुळे , खास या सणासाठी नोकरदार वर्गीय वर्षभर आर्थिक नियोजन करत असतात. त्यामुळे खास या सणासाठी, सरकारकडून शासन निर्णय काढून १ सप्टेंबर रोजी होणारे कर्मचारी व अधिकाऱ्यांचे वेतन २६ ऑगस्ट रोजी देण्यास सरकारकडून मान्यता देण्यात आली आहे. जेणेकरून गणेशोत्सव काळातील खर्चासाठी खिसा गरम आणि हात ढिला होणार नाही. जिल्ह परिषद, मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था, अकृषि विद्यापीठे/ कृषी विद्यापीठे व त्यांच्या संलग्न अशासकीय महाविद्यालयांचे अधिकारी व कर्मचारी तसेच निवृत वेतनधारक / कुटुंब निवृत वेतनधारक यांनाही हा निर्णय लागू राहणार आहे. त्यामुळे, या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाला तब्बल ५ दिवस आधीच आपला पगार मिळणार आहे.

## बिडकीन ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी किरण गुजर बिनविरोध निवड



बिडकीन तभा वृत्तसेवा दि २१ ऑगस्ट रोजी पैठण तालुक्यातील सर्वांत मोठी असलेली बिडकिन ग्रामपंचायत उपसरपंच पदाची निवडणूक पार पडली. या ग्रामपंचायतीच्या अडीच वर्षाचा निवड करण्याचे ठरल्याप्रमाणे अंजली गोरडे उपसरपंच पदाचा अडीच वर्षाचा कार्यकाळ संपल्याने त्यांनी राजीनामा दिल्याने उपसरपंच पद हे रिक्त होते आज दि २१ गुरुवार रोजी बिडकीन ग्रामपंचायत कार्यालयामध्ये निवडणूक घेण्यात आली.या पदासाठी शिवसेनेच्या किरण सुभाष गुजर यांनी उपसरपंच पदासाठी अर्ज दाखल केला मात्र त्यांच्या विरोधात उमेदवारी अर्ज न आल्याने किरण गुजर यांची बिनविरोध उपसरपंच पदासाठी निवड करण्यात आली यावेळी निरीक्षक बिडकीन मंडळ अधिकारी रवींद्र जोशी, तलाठी सचिन काशिकर, ग्रामविकास अधिकारी अरुण गोरडे यांनी प्रक्रिया पार पाडली. उपसरपंच पदी निवड झाल्याने सरपंच अशोक धर्मे यांच्यासह आदींनी शुभेच्छा दिल्या.

## भडगाव पारोळा रस्त्यावर वाघरे येथे सोयगाव धुळे बसचा भीषण अपघात एक ठार पाच गंभीर जखमी

### जखमी मध्ये सोयगावच्या तिघांचा समावेश

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२१ ऑगस्ट

भडगाव-पारोळा मार्गावर वाघरे गावाजवळ सोयगाव आगाराच्या सोयगाव-धुळे या बसचा एक वाजता भीषण अपघात झाला आहे. सोयगावहून धुळ्याकडे जाणाऱ्या एसटी बस आणि धुळ्याहुन पारोळा कडे जाणाऱ्या टेम्पोने सोयगाव आगाराच्या बसला समोरा समोर वळण रस्त्यावर जोरदार धडक दिली. या अपघातात एक जण ठार झाला असून बसच्या चालकासह पाच जण गंभीर जखमी झाले आहेत जखमी मध्ये सोयगावच्या तिघांचा समावेश आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

बुधवार २० ऑगस्ट रोजी एक वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. सोयगाव आगाराची एसटी बस (क्र.एम एच-१४-बी टी-१९८४) सोयगावहून धुळ्याकडे जात असताना वाघरे गावाजवळ समोरून येणाऱ्या टेम्पो (क्र.एम एच-१९ सी वाय-१६०६) या टेम्पोने बसला समोरून आदळून झालेल्या जोरदार धडकेत हा अपघात झाला. या धडकेनंतर बसमधील आणि टेम्पोमधील प्रवासी जखमी झाले. घटनास्थळी मदतीसाठी स्थानिक नागरिक तसेच प्रशासन पोहोचले.

अपघाताची माहिती मिळताच जगद्गुरु श्री रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज संस्थानतर्फे चालविण्यात येणारी विनामूल्य रुग्णवाहिका सेवा तत्काळ सक्रिय झाली. रुग्णवाहिकेचे चालक आशुतोष शेलार यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तातडीने पारोळा येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. काही रुग्णांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अन्य खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.या भीषण अपघातात पंकज पाटील (३०, उंदीरखेडा) यांचा मृत्यू झाला आहे. अपघातात जखमी झालेल्यांमध्ये मिराबाई पंढरी सोनवणे (५५, सोयगाव), निलाबाई घनश्याम सिरसागर (७५, धुळे), अंजनाबाई रघुनाथ पाटील (७०, हनुमंत खेडा), मनोहर सजन पाटील (६०, चोरवड), रमेश धोंडू चौधरी (८०, भडगाव), मीराबाई रघुनाथ पाटील (८०, धुळे) आणि जानवी संतोष मोरे (१९, धुळे) यांचा समावेश आहे. या जखमींवर पारोळा आणि भोले विघ्नहर्ता रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सागर मराठे आणि यश ठाकूर यांनी देखील जखमींना रुग्णालयात दाखल करण्यासाठी मदत केली.

याशिवाय रघुनाथ गणपंत सोनवणे (ढेकू) हे देखील या अपघातात जखमी झाल्याचे समजते. काही जखमींची ओळख अद्याप पटलेली नसून अधिकृत माहिती पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे. या प्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.याप्रकरणी पारोळा पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे

## 'विवाह वर्स मॉडल-१ परिणयला प्रतिसाद; ४४ जैन तरुण-तरुणींनी सहभाग



छत्रपती संभाजीनगर: छत्रपती संभाजीनगर येथील बीजेएसचा नवा जीवन साथीदार निवड कार्यक्रम 'विवाह वर्स मॉडल-१ परिणय पथचे भव्य उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमात ५०० पेक्षा अधिक बायोडेटांमधून निवडलेल्या ४४ जैन तरुण-तरुणींनी सहभाग घेतला. या अंतर्गत तरुणांना जीवनसाथी कसा निवडावा आणि नाती कशी जपावी? याचे मार्गदर्शन प्रात्यक्षिक सत्रांद्वारे करण्यात आले. हा उपक्रम समाजातील तरुणांच्या आधुनिक विचारांना समर्पित असून, त्यांना जीवनसाथी निवड प्रक्रियेत पारदर्शक, अर्थपूर्ण आणि प्रतिष्ठित मंच उपलब्ध करून देतो.

बीजेएसचे संस्थापक शांतिलाल मुथ्था यांच्या मार्गदर्शनाखाली बीजेएसच्या मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन, अनिल रांका (नॅशनल हेड इन्स्यूजन प्रोग्राम), केतन शहा (महाराष्ट्र राज्य अध्यक्ष), ॲड. गौतम संचेती (माजी राज्य अध्यक्ष), डॉ. प्रविण पारख (राज्य महासचिव), पारस चोरडिया (राज्य प्रमुख - इन्सेप्शन प्रोग्राम), किशोर ललवानी (डएउ सदस्म), पारस बागरेचा (जिल्हा सल्लागार), राजेंद्र पगारिया (जिल्हा अध्यक्ष), दर्शना लुनावत (महिला विंग जिल्हा अध्यक्ष), संजय लोढा (जिल्हा सचिव), वनिता छाजेड (महिला विंग जिल्हा सचिव), रवि खिंवसरा, अनिल संचेती, फूलचंद जैन राजेंद्र सेठिया आणि ए. आर. मल्टीमीडिया यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमात संदीप काठेड, अविनाश दोडल, राखी फुलफगर (जिल्हा-उपसचिव), मित्तल जैन (जिल्हा-उपकोषाध्यक्ष) आणि सारिका चंडालिया (जिल्हा कार्यकारिणी सदस्ए) आदी मान्यवर उपस्थित होते.या संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना, निर्मिती आणि संचालन मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन यांनी केले आहे.

## भाजपा अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष पदी दानिश शेख



तभा वृत्तसेवा
कन्नड :- दि.२१ ऑगस्ट - भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये अल्पसंख्याक समाजाचा सहभाग वाढावा यासाठी पक्ष सतत प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून कन्नड तालुक्यात भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्याक आघाडीच्या तालुकाध्यक्ष पदी दानिश शेख यांची निवड करण्यात आली. जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांच्या अध्यक्षतेखाली हा नियुक्ती निर्णय जाहीर झाला.

या वेळी डॉ. प्रा. संजय गव्हाणे, भाजपा नेते मनोज पवार, काकासाहेब तायडे, सुनील पवार, कैलास जाधव, अनिल शिरसाठ, राजू भोसले, मनोज देशमुख, पवन ठाकूर, संदीप नरवडे, केतन त्रिभुवन, इम्रान शेख, सचिन राजपूत, तात्याराव भुजंग, शंकर राऊत, जीवन राजपूत, बंटी जाधव आदी मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

## वेताळवाडी शिवारात फवारणी करतांना शेतकऱ्याचा वीज प्रवाहाच्या धक्क्याने मृत्यू

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२१ ऑगस्ट



शेतात कपाशी पिकांना कीटकनाशके फवारणी करतांना शेतातील वीज पोलचा वीज प्रवाह उतरून पाय पडल्याने २५ वर्षीय युवा शेतकऱ्याचा तडफडून शेतात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना वेताळवाडी शिवारात गुरुवारी एक वाजेच्या सुमारास घडली पोळ्याच्या पूर्वसंध्येला शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याने सोयगाव परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.याप्रकरणी सोयगाव पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

वेताळवाडी शिवारात युवा शेतकरी शेख रईस शेख युनूस (वय-२५) हे गट क्र-६४ मधील कपाशी पिकांवर कीटकनाशके फवारणी करत असताना त्यांच्या शेतात असलेल्या वीजपोल मध्ये अचानक तांत्रिक बिघाड होऊन शेतात वीज प्रवाह उतरला दरम्यान फवारणी करत असलेल्या शेतकऱ्याचा त्या कक्षेत पाय पडून ते फवारणी पंप सह खाली कोसळले मात्र शेतातील वीजप्रवाह व्याप्त भागात ते कोसळल्या मुळे त्यांना जबर विजेचा धक्का बसला त्यामुळे ते जागीच ठार झाले आहे.दरम्यान घटनेची माहिती मिळताच सोयगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेचा पंचनामा केला महसूलच्या पथकाने घटनास्थळी पंचनामा केला मृत शेतकऱ्याचा मृतदेह दुपारी तीन वाजता शवविच्छेदन साठी सोयगाव येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला.वैद्यकीय अधीक्षक डॉ.दिनाजी खंदारे यांनी शवविच्छेदन करून अंत्यसंस्कार साठी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला गुरुवारी रात्री सात वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई,वडील,दोन भाऊ,एक बहीण,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी असा परिवार आहे.सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,उपनिरीक्षक गजानन आरेकर,जमादार राजू बर्डे,रवींद्र तायडे,गजानन दांडगे आदींनी ही प्रक्रिया पूर्ण केली.

## भारताच्या संरक्षण सामर्थ्यात वाढ; अग्नी-५ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी



ओडिशा: भारताच्या संरक्षण सिद्धतेत आज एक मोठा टप्पा पार पडला. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ओडिशामधील चांदीपूर येथील 'इंटिग्रेटेड टेस्ट रेंज' मधून भारताने 'अग्नी-५' या आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. या चाचणीने क्षेपणास्त्राच्या सर्व तांत्रिक आणि कार्यात्मक मापदंडांची यशस्वी पडताळणी केली.

अग्नी-५ हे ५००० किलोमीटरहून अधिक पल्ला असलेले एक अण्वस्त्र-सक्षम क्षेपणास्त्र आहे. 'संरक्षण संशोधन आणि विकास संस्थे'ने विकसित केलेले हे क्षेपणास्त्र भारताच्या जमिनीवर आधारित अण्वस्त्र धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. या क्षेपणास्त्रात अनेक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे, ज्यामुळे भारताची सामरिक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

अग्नी-५ ची प्रमुख वैशिष्ट्ये:

लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र: अग्नी-५ चा पल्ला ५००० किलोमीटरहून अधिक असल्याने संपूर्ण आशिया, युरोप आणि आफ्रिकेतील काही भाग याच्या टप्प्यात येतो.

अचूक मारा: अत्याधुनिक नेव्हिगेशन आणि मार्गदर्शन प्रणालीमुळे हे क्षेपणास्त्र लक्ष्यावर अचूक मारा करते.

MIRV तंत्रज्ञान: हे क्षेपणास्त्र 'MIRV' (Multiple Independently Targetable Re-entry Vehicle) तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे, ज्यामुळे एकाच क्षेपणास्त्रातून अनेक वेगवेगळ्या लक्ष्यांवर एकाच वेळी हल्ला करता येतो.

कॅनॉनयुक्त डिझाइन: यामुळे क्षेपणास्त्र जलद आणि सुरक्षितपणे तैनात करता येते, ज्यामुळे त्याची गतिशीलता वाढते.

या यशस्वी चाचणीमुळे भारताचे 'विश्वसनीय किमान प्रतिबंधक धोरण' अधिक मजबूत झाले आहे. ही चाचणी देशाच्या संरक्षण क्षेत्रासाठी एक मैलाचा दगड ठरली आहे.

## 'जिगीषा नाट्यसहवास' अंतर्गत नाट्य आस्वाद लेखन स्पर्धेचे निकाल जाहीर

छत्रपती संभाजीनगर, दि.२१ : यंदाच्या 'जिगीषा नाट्यसहवास' नाट्यमहोत्सवाच्या औचित्याने नाट्यरसिकांसाठी एक वेगळा उपक्रम राबविण्यात आला होता. नाट्यप्रेमींना लेखनाच्या माध्यमातून रंगभूमीचा आस्वाद घेता यावा यासाठी आपल्याला हे नाटक का आवडले? या विषयावर नाट्य आस्वाद लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धा सर्वांसाठी खुली होती सहभागासाठी कोणतेही प्रवेश शुल्क ठेवले नव्हते. सहभागी स्पर्धकांना कोणत्याही आवडत्या मराठी नाटकावर आधारित १००० ते १५०० शब्दांमधील आस्वादपर लेख लिहायचे होते. या स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक : रु. ५,००० मूल्याचे नाट्यविषयक ग्रंथ, द्वितीय पारितोषिक : रु. ३,००० मूल्याचे नाट्यविषयक ग्रंथ, तृतीय पारितोषिक : रु. २,००० मूल्याचे नाट्यविषयक ग्रंथ

निकाल पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आले आहेत -

प्रथम पारितोषिक : ऋतू सावे - असेन मी नसेन मी

द्वितीय पारितोषिक (संयुक्त विजेते) : श्रेया पांचाळ - हुंकारो, अदिती टपले काळमेख - संगीत देवबाभळी

तृतीय पारितोषिक (संयुक्त विजेते) :

मयूर कोठावळे - डोशींहळपस डळज्ञश ढींींह

किरण डोंगरदिवे - सखाराम बाइंडर

या स्पर्धेतील पारितोषिक वितरण सोहळा दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ६ वा. रुक्मिणी सभागृह, एम.जी.एम.परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. 'जिगीषा नाट्यसहवास'च्या आयोजन समितीच्यावतीने सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, शहरातील नाट्यरसिकांनी या पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विदेश

# बलुचिस्तानची गळचेपी



बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानची दडपशाही सुरूच आहेत. ते केवळ बलुचिस्तानचा आवाज दाबत नाही तर त्याचा गळा दाबत आहे. आता तिथे ३१ ऑगस्टपर्यंत इंटरनेट बंद ठेवण्यात आले आहे. इंटरनेट बंदमुळे शिक्षण, ऑनलाइन व्यवसाय आणि मीडिया रिपोर्टिंगमध्ये मोठा व्यत्यय येत आहे. सुरक्षेच्या कारणास्तव हे पाऊल उचलण्यात आल्याचे पाकिस्तानी सरकारचे म्हणणे आहे. बलुचिस्तान पोस्टने अधिकाऱ्यांना उद्धृत करत म्हटले आहे की पाकिस्तान टेलिकम्युनिकेशन अथॉरिटी (पीटीए) च्या अधिसूचनेने पुष्टी केली आहे की ३१ ऑगस्टपर्यंत संपूर्ण बलुचिस्तानमध्ये मोबाइल इंटरनेट सेवा बंद राहतील. सरकारी प्रवक्ते शाहिद रिंद म्हणाले की सशस्त्र गट त्यांच्या क्रियाकलापांचे समन्वय साधण्यासाठी इंटरनेटचा वापर करत आहेत. इंटरनेटवर बंदी घालण्याचा उद्देश अशा संप्रेषण माध्यमांमध्ये व्यत्यय आणणे आहे. संघीय सरकारच्या या निर्णयावर विद्यार्थी, व्यापारी, पत्रकार आणि मानवाधिकार संघटनांनी जोरदार टीका केली आहे. ऑनलाइन वर्ग घेणारे विद्यार्थी नाराज आहेत आणि असाइनमेंट सादर करू शकत नाहीत. ग्रामीण भागात परिस्थिती आणखी गंभीर आहे. क्वेटा, तुर्बत, पंजगुर आणि खुजदार येथील स्वतंत्र पत्रकार आणि उद्योजक म्हणतात की त्यांचे जीवनमान ठप्प झाले आहे. आमचे संपूर्ण काम इंटरनेटवर अवलंबून आहे. या बंदमुळे आम्हाला आर्थिक संकटाचा सामना करावा लागला आहे, असे एका व्यावसायिकाने सांगितले. मीडिया संस्थांवरही परिणाम झाला आहे. पत्रकारांचा दावा आहे की ते या प्रदेशातून बातम्या प्रसारित करू शकत नाहीत. काही जण याला ''माहिती बंद'' म्हणत आहेत. मानवाधिकार गटांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे आणि इंटरनेट बंद करणे हे नागरी स्वातंत्र्यांचे उल्लंघन आणि नागरिकांच्या शिक्षण, आर्थिक क्रियाकलाप आणि माहिती मिळवण्याच्या मूलभूत अधिकारांवर हल्ला असल्याचे म्हटले आहे. स्थानिक राजकीय आणि सामाजिक संघटनांचा असा युक्तिवाद आहे की सुरक्षा वाढवण्याऐवजी सरकार जनतेवर सामूहिक शिक्षा लादत आहे.

### बोलल्याबद्दल होणारा छळ

द बलुचिस्तान पोस्ट (टीबीपी) पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील परिस्थितीवर मत मांडते, ''बलुचिस्तान हा जगासाठी माहितीचा काळा डाग बनला आहे. ही परिस्थिती टिकवून ठेवण्यासाठी पाकिस्तानातील शक्तिशाली घटक सतत विविध युक्त्या अवलंबत आहेत. देशातील प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये बलुचिस्तानच्या वस्तुनिष्ठ वास्तवाबद्दल बोलणे हा एक अघोषित गुन्हा बनला आहे.'' टीबीपीने आपल्या संपादकीयात इतर मुद्दे उपस्थित केले आहेत. बलुचिस्तानच्या मुद्यावर लिहिणाऱ्या पत्रकारांना सरकारी दडपशाहीचा सामना करावा लागतो. राष्ट्रीय चिंता व्यक्त करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले जाते आणि जगाला बलुचिस्तानमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी मोबाईल इंटरनेटवर बंदी घालणे सामान्य झाले आहे. बलुचिस्तानच्या बहुतेक भागात इंटरनेट सेवा आधीच बंद करण्यात आली होती आणि मोबाईल इंटरनेट फक्त काही प्रमुख शहरांमध्ये उपलब्ध होते.

पाकिस्तानची बलुचिस्तानमध्ये दडपशाही सुरूच आहे. तेथील आवाज दाबण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत इंटरनेट बंद ठेवण्यात आले आहे. तेथे सत्य बोलणे, लिहिणे सगळेच प्रतिबंधित आहे. ही गळचेपी बलुचिस्तानच्या बंडाला कारणीभूत तर ठरणार नाही ना, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

बिघडत्या सुरक्षा परिस्थितीचे कारण देत, ६ ऑगस्टच्या संध्याकाळपासून संपूर्ण बलुचिस्तानमध्ये मोबाईल इंटरनेटवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. पाकिस्तानच्या मानवाधिकार आयोगाच्या ९-१२ जुलै २०२५ च्या तथ्य-शोधक अहवालाचा हवाला देत, टीबीपीने म्हटले आहे की बलुचिस्तानमध्ये लोकांना जबरदस्तीने उचलून नेण्याची एक अतिशय चिंताजनक प्रवृत्ती सुरू आहे. लोकशाही स्वातंत्र्यावर अंकुश लावला जात आहे. प्रांतीय स्वायत्तता आणखी कमी केली जात आहे. पत्रकारितेवर कडक निर्बंध आहेत. दडपशाहीची संस्कृती अखंडपणे सुरू आहे. हे सर्व घटक बलुचिस्तानमध्ये लोकांचे वेगळेपण आणि राजकीय अस्थिरता वाढवत आहेत. असे म्हटले आहे की माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात, इंटरनेट सेवा बंद केल्याने विद्यार्थी, व्यापारी, ई-कॉमर्स, मोबाइल बँकिंग आणि फ्रीलांसिंगशी संबंधित लोकांवर सर्वाधिक परिणाम होतो. तथापि, याचा प्रतिकार चळवळींवर तात्काळ परिणाम होत नाही, कारण इंटरनेट निर्बंध केवळ माहितीचा प्रवाह तात्पुरता थांबवू शकतात. माहितीवर प्रवेश मर्यादित केल्याने सत्य समोर येण्यास विलंब होऊ शकतो, परंतु ते जगाला बलुचिस्तानमधील जमिनीवरील वास्तवापासून कायमचे अनभिज्ञ ठेवू शकत नाही.

(पाञ्चजन्यवरून साभार)



## इतिहास

# काशी विश्वेश्वराचे सान्निध्य असलेले एकमेव मंदिर

नाशिक जिल्हा हा धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शहरात अनेक भागात मंदिरेच मंदिरे पाहायला मिळतात. त्यात गणेश मंदिराचा वेगळाच इतिहास वाचायला मिळतो. नाशिकच्या गोदा तीरावरील मोदकेश्वर गणेशाचे मंदिर पाहायला मिळते. आजही हे मंदिर सुस्थितीत असून या मंदिराची स्थापनेचा निश्चित कालावधी नसला तरी साधारण चारशे ते पाचशे वर्षांचा इतिहास लाभलेला आहे.

नाशिक शहरातील प्रसिद्ध असलेल्या गोदावरीच्या तीरावर गाडगेबाबा महाराज धर्मशाळेजवळ हे मंदिर असून मोदकेश्वर गणपती देवस्थान अतिशय पुरातन असून त्याचे इतिहास व स्थान प्राचीन असल्याचे सांगण्यात येते. नाशिकचे ग्रामदैवत म्हणून मोदकेश्वर गणपतीला म्हणून ओळखला जातो. गणेशकोश, पंचवटी-यात्रा दर्शन, गोदावरी माहात्म्य यात मोदकेश्वराचा उल्लेख आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध २१ गणपती क्षेत्रांत मोदकेश्वराची गणना होते. गोदावरीच्या पश्चिम तीरावर, नाव दरवाजाजवळ हे स्वयंभू गणेशाचे मंदिर आहे.

नाशिककरांचे ग्रामदैवत असल्याने अनेक भाविक शुभकार्याप्रसंगी, कार्यारंभी दर्शनासाठी येतात. दर महिन्याची संकष्टी चतुर्थी, भाद्रपद आणि माघातील उत्सवाच्या वेळी विविध अलंकारांनी मोदकेश्वराला सजविले जाते. गणेशोत्सवात मंदिराला आकर्षक रोषणाई केली जाते. त्या काळात विशेष महापूजेचे आयोजन केले जाते. भाविकांना प्रसाद म्हणून मोदक दिला जातो.

गणेशकोश, पंचवटी-यात्रा दर्शन, गोदावरी माहात्म्य यात मोदकेश्वराचा उल्लेख आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध २१ गणपती क्षेत्रांत मोदकेश्वराची गणना होते. गोदावरीच्या पश्चिम तीरावर, नाव दरवाजाजवळ हे स्वयंभू गणेशाचे मंदिर आहे. नाशिककरांचे ग्रामदैवत असल्याने अनेक भाविक शुभकार्याप्रसंगी, कार्यारंभी दर्शनासाठी येतात. दर महिन्याची संकष्टी चतुर्थी, भाद्रपद आणि माघातील उत्सवाच्या वेळी विविध अलंकारांनी मोदकेश्वराला सजविले जाते. गणेशोत्सवात मंदिराला आकर्षक रोषणाई केली जाते. त्या काळात विशेष महापूजेचे आयोजन केले जाते.



### अशी आहे मोदकेश्वर गणेश मूर्ती

मोदकेश्वर मंदिरातील मूर्ती स्वयंभू असून मूर्तीचा मोदकासारखा आकार असल्याने मंदिराला मोदकेश्वर गणेश मंदिर हे नाव पडले. मंदिराला तीनशे ते चारशे वर्षांचा इतिहास असल्याने मंदिरातील काही भाग पुरातन इतिहासाची साक्ष देतो. तर चार खांब असलेल्या गाभाऱ्यात शेंदूर विलेपित मोदकेश्वर विराजमान आहे. मागील बाजूस रिद्धी-सिद्धी यांच्या मूर्ती आहेत. मोदकेश्वराच्या बाजूलाच विश्वेश्वर महादेव आहे. पिता-पुत्रांचे इतके जवळचे सान्निध्य असणे हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. याबरोबरच बाजूलाच इतर देवतांच्या छोट्या छोट्या मूर्ती आहेत. प्रात:काळी सूर्यकिरण मोदकेश्वरावर येत असल्याने हे चित्र विलोभनीय असते.

### अशी आहे आख्यायिका

मोदकेश्वर या नावामागे रोचक आख्यायिका सांगितली जाते. एकदा गणेश आणि स्कंद यांच्यात मोदकावरून जोरदार भांडण झाले. यावेळी महादेवाने त्यांच्यातील वादावर तोडगा काढत त्यांची परीक्षा घेतली. या परीक्षेत गणेश उत्तीर्ण झाले. यानंतर गणेशाला तो मोदक प्राप्त झाला. हाच मोदक हातात घेऊन गणेश भ्रमण करत असताना नाशिकच्या गोदावरी नदीच्या काठाने जात असताना त्याच्या हातातील मोदक खाली पडला. मोदकासाठी परीक्षा द्यावी लागली होती, शिवाय आवडता पदार्थ असल्याने तो खाली पडल्यामुळे गणेश खाली उतरला, याची आठवण रहावी म्हणून गणेशाने स्वयंभू गणेशमूर्तीच्या स्वरुपात तेथे वास्तव्य केले. पुढे हेच ठिकाण मोदकेश्वर मंदिर म्हणून प्रचलित झाले.

## आरोग्य

# तीन इलेक्ट्रॉनिक वस्तू... हृदयासाठी हानिकारक



आजच्या युगात, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनली आहेत. मोबाईल असो, वाय-फाय राउटर असो किंवा इतर स्मार्ट उपकरणे असोत, हे सर्व आपले दैनंदिन काम सोपे करतात. पण तुम्हाला माहिती आहे का की काही इलेक्ट्रिक उपकरणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात? विशेषतः, हृदयरोग आणि हृदयविकाराचा धोका वाढवण्यात हे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जर तुम्ही हृदयाच्या आरोग्याबद्दल जागरूक असाल, तर तुम्ही तुमच्या घरात ठेवलेल्या या तीन इलेक्ट्रॉनिक वस्तूंकडे त्वरित लक्ष दिले पाहिजे आणि त्या लवकरात लवकर काढून टाकल्या पाहिजेत किंवा त्यांचा वापर मर्यादित ठेवला पाहिजे.

### वाय-फाय राउटर आणि मोबाईल रेडिएशन

आजच्या डिजिटल युगात, प्रत्येक घरात वाय-फाय राउटर आणि मोबाईल फोन आहेत. पण फार कमी लोकांना माहिती आहे की त्यांच्यापासून निघणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशनचा आपल्या शरीरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. ईएमएफ किरणोत्सर्गाच्या सतत संपर्कात राहिल्याने हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात. उच्च किरणोत्सर्गामुळे रक्तदाब आणि ताण वाढू शकतो, ज्यामुळे हृदयावर दबाव येतो. जास्त काळ वाय-फाय आणि मोबाईल रेडिएशनच्या संपर्कात राहिल्याने हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.





**काय करावे:** रात्री वाय-फाय राउटर बंद करा आणि तो बेडरूमपासून दूर ठेवा. झोपताना मोबाईल फोन उशाजवळ ठेवू नका आणि हेडफोनऐवजी स्पीकर वापरा. तसेच ईएमएफ ब्लॉकर डिव्हाइस वापरा.

### इंडक्शन कुकटॉप आणि मायक्रोवेव्ह ओव्हन

आजकाल, इंडक्शन स्टोव्ह आणि मायक्रोवेव्हचा वापर वाढला आहे, परंतु हे हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात हे फार कमी लोकांना माहिती आहे. इंडक्शन कुकटॉप्स आणि मायक्रोवेव्हमधून उत्सर्जित होणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्हज शरीराच्या पेशींवर नकारात्मक परिणाम करू शकतात. यामुळे रक्ताभिसरणावर परिणाम होऊ शकतो आणि हृदयावर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. त्यांच्या दीर्घकाळ वापरामुळे हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात आणि रक्तदाब वाढू शकतो.

**काय करावे:** इंडक्शन कुकटॉपऐवजी पारंपारिक गॅस स्टोव्ह वापरा. मायक्रोवेव्हचा वापर कमीत कमी करा, विशेषतः जास्त वेळ उभे राहू नका आणि वाट पाहू नका. अन्न गरम करण्यासाठी स्टील किंवा मातीची भांडी जास्त वापरा.

### स्मार्टवॉच आणि फिटनेस ट्रॅकर्स

जरी स्मार्टवॉच आणि फिटनेस ट्रॅकर्स आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी उपयुक्त वाटत असले तरी, त्यांच्याकडून उत्सर्जित होणारे ब्लूटूथ आणि आरएफ रेडिएशन तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. स्मार्ट घड्याळे सतत ब्लूटूथ सिग्नल पाठवतात आणि प्राप्त करतात, ज्यामुळे शरीर सतत रेडिएशनच्या संपर्कात राहते. अनेक अभ्यासातून असे दिसून येते की हृदयाच्या ठोक्यांच्या लयीत अडथळा येऊ शकतो. जर एखाद्याला आधीच हृदयरोग असेल, तर सतत स्मार्ट घड्याळ वापरल्याने ही समस्या आणखी वाढू शकते.



**काय करावे:** स्मार्टवॉच मर्यादित प्रमाणात वापरा आणि रात्री ते काढा. ब्लूटूथशी जोडलेली उपकरणे जास्त काळ घालू नका. गरज असेल तेव्हाच तुमचे स्मार्टवॉच वापरा आणि नियमित ब्रेक घ्या.

## घरवापसी

# जन्माष्टमीला 'कृष्ण' परतला

महादेवगड मंदिरात आयोजित एका भव्य घरवापसी समारंभात खंडवा जिल्ह्यातील एका मुस्लिम तरुणाने सनातन धर्मात परत प्रवेश केला. मूळचे अनीश नाव असलेल्या या तरुणाने घरवापसीद्वारे आपली मुळे स्वीकारली आणि कृष्ण हे नाव निवडले. हे नाव भगवान कृष्णावरील त्याच्या आयुष्यभराच्या भक्तीचे प्रतिबिंब असल्याचे त्याने म्हटले आहे.

मंदिरात संपूर्ण वैदिक परंपरेने हा विधी पार पडला. आता कृष्ण असलेल्या अनिशचे वैदिक मंत्रोच्चार, पूजा आणि पुष्पवृष्टीसह औपचारिक स्वागत करण्यात आले. देशभरातील हिंदूंनी भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा केला त्याच दिवशी शेकडो भाविकांनी त्याची घरवापसी पाहिल्यामुळे मंडीतील वातावरण भक्तीने भरले होते.

आपल्या निर्णयाबद्दल बोलताना कृष्णाने (पूर्वीचे अनीश) सांगितले की सनातन धर्माकडे त्यांचा प्रवास बालपणापासून सुरू झाला होता. तो भागवत कथा ऐकत होता आणि विशेषतः भगवान श्रीकृष्णांच्या खेळकर पण गहन लीलांकडे आकर्षित झाला होता. ''कृष्णाच्या लीलांमधल्या करुणा, मैत्री आणि जीवनाच्या धड्यांनी मला खोलवर स्पर्श केला. गीतेतील त्यांच्या शिकवणींनी माझ्या जीवनाची दिशा बदलली. मला अस्तित्वाचा खरा उद्देश आणि आत्म्याचे शाश्वत मूल्य



कळले.

भगवान कृष्ण हे केवळ देवता नसून ''खरा मार्गदर्शक, मित्र आणि जीवन शिक्षक'' असल्याचे सांगून, कृष्णाने स्पष्ट केले की जन्माष्टमी हा हा निर्णायक पाऊल उचलण्यासाठी सर्वात शुभ क्षण होता.

भगवान कृष्ण हे केवळ देवता नसून ''खरा मार्गदर्शक, मित्र आणि जीवन शिक्षक'' असल्याचे सांगून, कृष्णाने स्पष्ट केले की जन्माष्टमी हा हा निर्णायक पाऊल उचलण्यासाठी सर्वात शुभ क्षण होता.

मंदिराचे प्रभारी अशोक पालीवाल पुढे म्हणाले की, अनीश यांनी १६ व्या शतकातील मुस्लिम कवी रस्खान यांच्याकडूनही प्रेरणा घेतली, जे त्यांच्या भावपूर्ण कृष्णभक्तीसाठी ओळखले जातात. ''रस्खानच्या कविता कृष्णाचे दिव्य बालपण, वृंदावनाचे सौंदर्य आणि गोपींच्या भक्तीचे सुंदर चित्रण करतात. या श्लोकांनी अनीशवर खोलवर छाप सोडली आणि त्याच्यात भक्तीचे बीज रोवले.

त्यांनी पुढे जोर देऊन सांगितले की, सनातन धर्म सर्वसमावेशक आणि सार्वत्रिक आहे. जेव्हा भक्ती खरी असते तेव्हा धर्म, जात किंवा समुदायाचा कोणताही अडथळा नसतो. अनीशची घरवापसी ऐच्छिक होती, कोणत्याही जबरदस्ती किंवा सक्तीशिवाय. तो फक्त धर्माच्या शाश्वत मार्गावर घरी परतला आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

## अण्णाभाऊ साठेंना अभिवादन...



### मराठा आरक्षण रथयात्रेला तुळजापूरात उत्स्फूर्त स्वागत

**तुळजापूर, दि.२१ ऑगस्ट -**

मराठा समाजाच्या न्याय्य आरक्षणाच्या मागणीसाठी निघालेल्या रथयात्रेचे तुळजापूरात उत्स्फूर्त स्वागत झाले. मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील ही रथयात्रा श्री तुळजाभवानीच्या चरणी नतमस्तक होऊन पुढे लातूरकडे मार्गस्थ झाली. आरक्षण हा आमचा हक्क असून, तो मिळेपर्यंत लढा सुरूच राहील, असे गायकवाड यांनी सांगितले. समाजबांधवांचा मोठा सहभाग व घोषणाबाजीमुळे परिसर दुमदुमून गेला.

### ॲड. गुंड यांना एम.फिल. पदवी

**उमरगा, दि.२१ ऑगस्ट -**



ॲड. गुंड मॅडम यांनी संगणक विज्ञान (Computer Science) या विषयात Master of Philosophy पदवी प्रथम श्रेणीत संपादन करून उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांना पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. ॲड. गुंड यांनी अभ्यासाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदविल्याने त्यांच्या या कर्तृत्वपूर्ण यशाची सर्वत्र चर्चा होत आहे.



### वाशी तालुक्यातील लाडक्या बहिणीकडून देवा भाऊला १००० राख्या रवाना

**वाशी, दि.२१ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या आदेशानुसार वाशी तालुका महिला मोर्चा अध्यक्ष त्रिशला देशमुख तसेच उपाध्यक्ष पुष्पा पोरे, रेशमा डोरले, पारा येथील विजया मॅडम तसेच तालुक्यातील अनेक गावांमधील लाडक्या बहिणींनी एकूण १००० राख्या लाडके बंधू देवा भाऊ मुख्यमंत्री फडवणीस यांना दि.१९ ऑगस्ट रोजी जिल्हा पदाधिकाऱ्यामार्फत पाठवण्यात आल्या वाशी तालुका सर्वात लहान तालुका असूनही महिला मोर्चा अध्यक्ष त्रिशाला देशमुख यांनी तालुक्यातील प्रत्येक गावाला भेटी देऊन १००० राख्या पाठवल्या व संपूर्ण तालुक्यातील महिलांमध्ये भाजपमय वातावरण निर्माण केले. त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सहकार्य महिलांचे कौतुक केले जात आहे.



### लोहारा तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेस सुरुवात

**लोहारा, दि.२१ ऑगस्ट -**

लोहारा तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेस गुरुवारी (दि.२१) सुरुवात झाली आहे. बॅडमिंटन स्पर्धेने या तालुकास्तरीय स्पर्धेस सुरुवात करण्यात आली. तालुका क्रीडा संयोजन समितीच्या वतीने लोहारा तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा घेण्यात येत आहेत. गुरुवारी (दि.२१) लोहारा शहरातील सप्तरंग मंगल कार्यालयात बॅडमिंटन स्पर्धेने या तालुकास्तरीय स्पर्धेस सुरुवात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन गिरीश भगत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका क्रीडा संयोजन समितीचे अध्यक्ष गोपाळ सुतार, सचिव मुकेश सोमवंशी, किशोर पवार, संतोष जाधव, विजयमाला मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत एकूण १५ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी पंच म्हणून महेश शिंदे यांनी काम पाहिले.



### स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिराच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

**उमरगा, दि.२१ ऑगस्ट -**

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिराच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले. शहरातील मलंग विद्यालयात पार पडलेल्या या स्पर्धेत योगासन गटात आरती पाटील (सातवी) हिने द्वितीय क्रमांक, कैवल्य कांबळे (सातवी) याने द्वितीय क्रमांक, तर श्रावणताटे (सातवी) याने तृतीय क्रमांक मिळवला. बुद्धिबळ स्पर्धेत आदर्श गायकवाड (सातवी) व अपूर्वा रेड्डी (सहावी) यांनी उत्तम कामगिरी करीत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली. विद्यार्थ्यांना ज्येष्ठ शिक्षक दत्तात्रय कोकणे व गोपाळ आष्टे यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्यांचा शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार व शिक्षकांच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला.

# 'राजा बोले दल हले' आ. सवंतांच्या फोन ने तहसीलदार कृषी अधिकारी यांच्या पळापळी





## जिओ टॅगिंग फोटोने शेतकऱ्याची डोकेदुखी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ ऑगस्ट -**

वाशी तालुक्यात अतिवृष्टी पावसाने धुमाकूळ माजवला आहे. यात शेतकऱ्याचं मोठं नुकसान झालं आहे. तूर, उडीद, मका, केळी, कांदा, ऊस, सोयाबीन पिके पाण्याखाली गेली असल्याने पिके जागेवरती सडून जाऊ लागली आहेत. हातात आलेला घास डोळ्यासमोर वाया जात असल्याने शेतकरी हातबल झाला आहे. त्यात जिओ टॅगिंग चे फोटो अनिवार्य केल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची जास्त डोकेदुखी वाढली असल्याचे शेतकरी सांगतात. याबाबत प्रशासनाकडून दुसरा काही निर्णय घेण्यात येणार का? याची वाट शेतकरी बघत आहेत.

तालुक्यात सर्वत्र झालेल्या अतिवृष्टीमुळे काही गावांना जोडणारे फुल वाहून गेले आहेत. त्यामुळे गावांचा संपर्क तुटला असून जनजीवन विस्कळीत झाला आहे.



पावसाचा जोर जास्त असल्याने बांधासह शेतातील माती वाहून गेली आहे. झालेल्या नुकसानीची पाहणी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जिल्ह्याचे खा. ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी पाहणी करून तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या होत्या.

शरदचंद्र पवार गटाला रामराम ठोकून अजित दादा गटात नुकताच प्रवेश केलेले माजी आमदार राहुल मोटे हे पायाला भिंगरी लावून नुकसानग्रस्त भागाची पाहणी करत असताना विद्यमान आमदार तानाजी सावंत कुठे आहेत? याची चर्चा विरोधकांकडून उपस्थित केली जात होती. आमदार सावंत मतदारसंघात येऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी अशी शेतकरी वर्गामध्ये अपेक्षा आहे. त्यात त्यांच्या कार्यकर्त्यांनी सुरू असलेली ही चर्चा सावंतापर्यंत पोहोचवली अनु मग काय? राजा बोले दल हले आमदार तानाजी सावंत हे क्शन मोडमध्ये आले आणि त्यांनी सर्व तहसीलदारांना पुण्यातून फोनवरून प्रसासनला सूचना केल्या. विधानसभेत एकही मंडळ, गाव, गण, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्यापासून वंचित राहू नये याची खबरदारी घेण्यात यावी अशा सूचना सावंत यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. मग सुरू झाली ती तिन्ही तालुक्यातील तहसीलदार, कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, मंडळ अधिकारी, तलाठ्यांच्या पळापळी पंचनामे.

परंतु विधानसभेतील जनतेला आमदार तानाजी सावंत कधी दर्शन देणार अशी उलटसुलट चर्चा यानिमित्ताने विरोधकांकडून उपस्थित केली जाऊ लागली आहे.

> यंदा ई पिक पाहणी केलेल्या शेतकऱ्यांनाच भविष्यात अनुदान आणि पीकविमा मिळणार आहे, त्यामुळे ई पिक पाहणी करावीच लागणार आहे, मात्र सर्व्हर डाऊन असल्याने ई पिक पाहणी होत नाही, प्रशासनाने तत्काळ दखल घेणे आवश्यक आहे. जेणेकरून शेतकऱ्यांची गैर सोय होणार नाही
>
> **- गणेश बोराडे,** शेतकरी

> शासनाकडून नुकसानीचा जिओ टॅगिंग फोटो अनिवार्य असल्याचं सांगितल्यानंतर शेतकऱ्यांची आता डोकेदुखी वाढली आहे. सर्वच शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे जिओ टॅगिंग कशी करायची अन नाही झाली तर मदत मिळेल का? या संभ्रमात शेतकरी आहेत.

## नियमित सेवेत समायोजनासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ ऑगस्ट -**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत (NRHM) कार्यरत असलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नियमित सेवेत समायोजनाबाबत शासनाने पूर्वीच निर्णय घेतला असला तरी त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नसल्याने जिल्ह्यातील आरोग्य कर्मचारी आक्रमक झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर सुरू झालेले आंदोलन आज तिसऱ्या दिवशीही कायम राहून अधिक तीव्र झाले आहे.

या आंदोलनात जिल्ह्यातील जवळपास ८०० कर्मचारी व अधिकारी सहभागी झाले असून, पर्यवेक्षक, लॅब तंत्रज्ञ, डेटा एंट्री ऑपरेटर, लेखनिक, आरोग्य सहाय्यक आदी पदावरील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत असूनही नियमित सेवेत समावेश न झाल्याने त्यांचा असंतोष शिगेला पोहोचला आहे.

आंदोलनकर्त्यांनी जिल्हा आरोग्य कार्यालयासमोर मोठ्या संख्येने जमून घोषणाबाजी केली. शासन निर्णय केवळ कागदावर न राहता तातडीने अंमलात आणावा, अशी मागणी त्यांनी केली. शासनाने लवकरच ठोस निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

या आंदोलनामुळे ग्रामीण आरोग्य सेवांवर काही प्रमाणात परिणाम झाला असून, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रातील काही सेवा विस्कळीत झाल्या आहेत. मात्र, तातडीच्या सेवांसाठी कर्मचारी उपलब्ध राहतील, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षितता, सेवेत स्थैर्य व शासकीय सेवकांचा दर्जा मिळणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सुरळीत राहण्यासाठी व कर्मचाऱ्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेणे अत्यावश्यक असल्याची सर्व स्तरांतून मागणी होत आहे.

या आंदोलनात जीवन कुलकर्णी, किरण बारकुल, सतीश गिरी, किरण तानवडे, किशोर गवळी, अशोक चव्हाण, किशोर तांदळे, अमर सपकाळ, कलीम शेख आदी अधिकारी- कर्मचारी सहभागी झाले होते.

## डी.बी.ए समूहतर्फे संत सेना महाराजांची ६२५ वी पुण्यतिथी साजरी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ ऑगस्ट -**

डी.बी.ए समूहाच्या वतीने परांडा येथील शासकीय विश्रामगृहात संत सेना महाराजांची ६२५ वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी डी.बी.ए समूहाचे अध्यक्ष दयानंद बनसोडे, नायब तहसीलदार पांडुरंग माढेकर, राहुल बनसोडे, कालिदास काशीद, कीर्तनकार बालाजी महाराज, महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

माढेकर व बालाजी महाराज यांनी संतांच्या जीवनावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जय हनुमान ट्रेलरचे अंकुश जमदाडे यांच्यासह नाभिक समाज बांधव व नागरिक उपस्थित होते.

## कळंब शहरात मोकाट जनावरांचा उच्छाद; नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२१ ऑगस्ट -**

मुसाफिरांप्रमाणेच आता मोकाट जनावरांनी कळंब शहराला मुक्काम केले असून यामुळे नागरिक व प्रवासी वर्ग त्रस्त झाले आहेत. कळंब बसस्थानक परिसरासह शहरातील मुख्य चौकांमध्ये ही बेवारस जनावरे दिवसरात्र ठाण मांडून बसल्याने अस्वच्छता व वाहतूक कोंडीची समस्या तीव्र झाली आहे.

बसस्थानक परिसरात मोकाट गुरांचा वावर असल्याने प्रवाशांना घाणीमधून जावे लागते. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक, होळकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, ढोकी नाका या ठिकाणी जनावरांचा मोठा उपद्रव होत आहे.

भरदिवसा व रात्री या जनावरांचे रस्त्यावर थाट मांडल्याने वाहनांना अडथळा निर्माण होतो. अनेकदा अपघात घडून पादचारी जखमी झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.




याशिवाय शहरात गेल्या काही वर्षांपासून मोकाट गुरांसोबतच श्वानांची संख्याही झपाट्याने वाढली आहे. शाळा-महाविद्यालये सुरू झाल्यामुळे वाहतुकीचा ताण वाढला असताना या जनावरांचा उच्छाद अधिकच त्रासदायक ठरत आहे.

नागरिक व प्रवासी वर्गाचा एकमुखी आवाज असा आहे की, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना करावी, अन्यथा अपघात व अस्वच्छतेमुळे गंभीर परिणाम भोगावे लागतील.

## प्रा. डॉ. सचिन कंदले उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२१ ऑगस्ट -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूरचे सुपुत्र प्रा. डॉ. सचिन चंद्रशेखर कंदले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या शिक्षण व विस्तार विभागामार्फत उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित भव्य पुरस्कार वितरण समारंभात विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. विजय फुलारी यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू प्रो. वाल्मिक सरवदे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सन २००३ पासून स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथे संस्कृत विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा. डॉ. कंदले मागील १५ वर्षांपासून आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या काळात त्यांनी जलसाक्षरता, वाहन साक्षरता, वृक्ष संवर्धन कार्यशाळा, कुपनलिका पुनर्भरण यांसारखे अनेक उपक्रम राबवले.

कार्यात कल्पकता आणि सामाजिक भान जोपासल्यामुळे त्यांना हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला.

त्यांच्या या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. विजय फुलारी, प्र-कुलगुरू प्रो. वाल्मिक सरवदे, कुलसचिव प्रो. प्रशांत अमृतकर, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य गजानन सानप, खडकाळी मॉर्निंग क्लब अणदूर व विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## प्रवास आयुष्याचा, संघर्ष अस्तित्वाचा आत्मचरित्राचे बसवराज पाटील यांच्या हस्ते प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ ऑगस्ट -**



शहरातील श्रमजीव महाविद्यालय येथे प्रा. उमाकांत खरोसेकर लिखित प्रवास आयुष्याचा, संघर्ष अस्तित्वाचा या आत्मचरित्राचे प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. या पुस्तकाचे प्रकाशन भाजपा नेते तथा माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विनायकराव पाटील, रामकृष्णपंत खरोसेकर, माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. राम सोलनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रकाशनानंतर बोलताना बसवराज पाटील म्हणाले, प्रा. उमाकांत खरोसेकर यांचे आत्मचरित्र म्हणजे कठोर परिश्रमातून उभ्या राहिलेल्या जीवनप्रवासाचे दर्शन घडवणारे प्रेरणादायी लेखन आहे. यातून नव्या पिढीला संघर्षातून मार्ग काढण्याची प्रेरणा मिळेल.

लेखक प्रा. खरोसेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, हा प्रवास फक्त माझा नाही, तर हजारो सामान्य माणसांच्या जगण्याचा संघर्ष यात प्रतिबिंबित झालेला आहे. माझे अनुभव युवकांना दिशादर्शक ठरावेत, ही अपेक्षा आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शौकत पटेल यांनी केले, तर आभार प्राचार्य डॉ. राम सोलनकर यांनी मानले. श्रमजीव महाविद्यालयातील प्राध्यापक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलिस निरीक्षक सचिन यादव यांचा समाजबांधवांकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ ऑगस्ट**




श्री संत शिरोमणी संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त नळदुर्ग नाभिक समाज मंडळाच्या वतीने लोकमान्य वाचनालयात कीर्तन व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी पोलिस निरीक्षक सचिन यादव, पत्रकार विलास येडगे, सल्लागार उद्धव सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते.

संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

समाजबांधवांकडून झालेल्या सत्कारामुळे मी भारावून गेलो असल्याचे सचिन यादव यांनी सांगितले. नाभिक समाज हा प्रामाणिक असून हिंदवी स्वराज्य स्थापनेत मोठे योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात निवृत्त कर्मचारी, पत्रकार व प्रतिष्ठित नागरिकांचा सत्कार करण्यात आला. यानंतर हभप. तेजश्रीताई खटके यांचे कीर्तन झाले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संदीप सुरवसे, नेताजी महाबोले, विशाल सुरवसे, नागनाथ वाळके, बाळासाहेब महाबोले आदींनी परिश्रम घेतले.

## पारधी वस्तीवरील महिलांची पंचायत समितीवर धडक

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ ऑगस्ट -**

बोरी फाटा पारधी वस्तीवरील महिलांनी आपल्या हक्काच्या मागण्या मांडण्यासाठी पंचायत समितीवर धडक दिली. भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव आप्पा आखाडे व वाशी तालुका बेटी पढाव अध्यक्षा उज्वला पाटील यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राऊत यांच्यासमोर गाराणे मांडून निवेदन सादर केले.




निवेदनात पारधी समाजाला आवास योजनेचा लाभ मिळत नाही, विधवांना पेन्शन मिळत नाही, पावसाळ्याच्या दिवसांतही शेतीवर फवारणी होत नाही तसेच शासकीय योजनांचा कुठलाच लाभ पोहोचत नसल्याबाबत तक्रार करण्यात आली. हे निवेदन पंचायत समितीचे ओएस शिंदे व मुळे यांनी स्वीकारले. त्यानंतर गटविकास अधिकारी राऊत आल्यावर महिलांना सभागृहात बसवून मार्गदर्शन केले.

राऊत यांनी महिलांना सांगितले की, कष्टाशिवाय काही मिळत नाही, परंतु तुमच्या सर्व मागण्यांचा विचार करून योजनांचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी राऊत यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. जिल्हा उपाध्यक्ष महादेव आप्पा आखाडे यांनीही भाषणातून पारधी समाजाला सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळावा अशी ठाम मागणी केली.

या आश्वासनानंतर महिलांनी टाळ्या वाजवून अधिकारी व नेत्यांचे स्वागत केले.

## गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी उमेश नाईक

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ ऑगस्ट -**

नळदुर्ग येथील नवचैतन्य तरूण गणेश मंडळाच्या नव्या कार्यकारिणीची निवड २० ऑगस्ट रोजी माजी नगरसेवक संजय बताले, संजय मोरे व मुकुंद नाईक यांच्या उपस्थितीत झाली.

अध्यक्षपदी उमेश नाईक तर कार्याध्यक्षपदी समीर मोरे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी सुनिल गव्हाणे, सचिवपदी धनंजय कुलकर्णी, कोषाध्यक्षपदी मुकुंद नाईक, सहसचिवपदी अंकुश जाधव यांची निवड झाली.

यावेळी मोहन नाईक, मुकुंद नाईक, संजय मोरे, ज्योतिबा येडगे, दिलीप कुलकर्णी, विलास येडगे, गणेश मोरडे, अप्पु स्वामी, ठाकुर आदिंची करण्यात आली.

## अग्रलेख...

# ऑनलाईन गेमिंगचा भस्मासुर रोखण्यासाठी...

आपल्या परंपरेत आणि आपल्या लोकसंस्कृतीत बाटली, बाई आणि जुगार, इंग्रजीत बोलायचे झाले तर रम, रमा आणि रमी यांचा नाद, सवय किंवा व्यसन निषिद्ध मानले आहे. जाणकार अभ्यासक या तीनपैकी जुगार किंवा रमी यांना सर्वाधिक धोकादायक मानतात. पत्ते, जुवा, जुगार, मटका, सट्टा, तीन पत्ती, थ्री कार्ड्स, कॅसिनो, द्यूत, चौसर अशा विविध प्रकारांनी किंवा नावांनी माणसाला आर्थिकदृष्ट्या बरबाद करणारे म्हणून हे खेळ ओळखले जातात. सुरुवातीला यातील काही खेळ हे 'खेळ' म्हणूनच आपण अनुभवू शकतो. जोपर्यंत हे काही प्रकार खेळ म्हणूनच खेळले जातील, तोपर्यंत ते निश्चितच आनंददायी आणि निरुपद्रवी असतील. पण या खेळांमध्ये आर्थिक भाग आला की त्यात रस घेणाऱ्यांची घसरण सुरू होते. ही घसरण प्रामुख्याने आर्थिक असते. त्यात पैसा 'पणा'ला लावण्यापासून सुरुवात होते. मग ईर्ष्या, चढाओढ, हार-जीत, जिद्द, खुन्नस, माज, मस्ती या साऱ्यांची त्यात सरमिसळ होते. पैसा पणाला लावण्यापासून सुरू झालेला 'हा बरबादीचा खेळ' पैशांनंतर प्रॉपर्टी आणि क्वचित प्रसंगी बायकोसारखी जवळची व्यक्ती पणाला लावण्यापर्यंत पोहोचतो, असे आपण कधी कधी ऐकत-वाचत असतो. संपत्ती आणि धर्मपत्नी पणाला लावण्यातून आणि त्यांना गमावण्यातून किंवा जिंकण्यातूनही कसे 'महाभारत' घडते, हे आम्हा भारतीयांना सांगायला नकोच.

सुरुवातीला अगदी चिल्लर एक-दोन रुपयांपासून हा पत्त्यांचा जुगार सुरू होतो. हा खेळ गंमत, टाईमपास म्हणून खेळणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. पण जेव्हा हार-जीत, कमावणे-गमावणे सुरू होते, त्यावेळी फायदा-नुकसान हा हिशेब व्हायला लागतो आणि त्यातली गंमत संपते. जो काहीतरी गमावतो, तो परत मिळविण्यासाठी पुन्हा पुन्हा खेळत राहतो. एवढेच नव्हे, तर जिंकतो तो सुद्धा अधिकाधिक जिंकण्यासाठी खेळतच राहतो. या खेळण्या-खेळण्यात हा खेळ आपला कसा खेळखंडोबा करून टाकतो, हे बहुतेकांना कळतही नाही. 'रात्री करोडपती जुगार खेळायला बसले आणि रात्रभरात रस्त्यावरच आले' असे अनेक किस्से आपण आपल्या अवतीभवती पाहत असतो. 'रात्री कारने खेळायला आले आणि रात्रभरात कार गमावून पैदल झाले' अशाही घटना दहापैकी आठांच्या बाबतीत घडू शकतात. रिकाम्या हाताने आलेले बॅगा भरून पैसे घेऊन गेले, असे दोघांच्याच बाबतीत होऊ शकते. एका जुगाऱ्याने म्हणे तीन पत्त्यांच्या जुगारात खूप काही कमावले, पण गमावले नाही. त्याने 'तीन पत्ते' असेच आपल्या कारखानदारीचे 'बोधचिन्ह' बनवून तो कारखाना आंतरराष्ट्रीय दर्जावर नेऊन ठेवला, असेही झाले आहे. पण क्वचितच... आयपीएल सामन्यांसाठी ऑनलाईन टीम तयार करून त्यावर बेटिंग करण्यापासून सुरू झालेला ऑनलाईन जुगाराचा प्रवास आता घरोघर ऑनलाईन तीनपत्ती, रमीपर्यंत येऊन पोहोचला आहे. लोकप्रिय अभिनेते, क्रिकेटर यांनी विविध माध्यमांतून केलेल्या जाहिरातींना बळी पडून सर्वसामान्य लोकसुद्धा या 'फास्ट आणि ईझी मनी'च्या नादी लागून पैसा गमावत आहेत, कर्जबाजारी होत आहेत आणि त्यांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. दुष्परिणामांची कल्पना असूनसुद्धा माणूस त्याच्या आहारी जातो आणि बहुतेक वेळा आपले सर्वस्व गमावून बसतो. जुगार समोरासमोरवाला असो की आभासी, तो चालवणारे कधीच तोट्यात जात नाहीत. त्याला जिंकणाऱ्यांना पैसे द्यावे लागत असले तरी तो तोट्यात जाण्याचा प्रश्न नसतो. कारण तो पैसा कमावण्यासाठीच लोकांना खेळवत असतो. जुगाराला चालना देण्यासाठी विविध मार्गांनी लोकांना सवय आणि पर्यायाने व्यसन लावण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

मोबाईल क्रांतीपूर्वी जुगार अस्तित्वात होताच. परंतु जुगार खेळणे आताइतके सहज नव्हते. घरातून बाहेर पडून विशिष्ट ठिकाणी जाऊन हे सर्व केले जायचे. जुगार खेळण्याला सामाजिक प्रतिष्ठा नव्हतीच. परंतु दुर्दैवाने हे चित्र आता बदलत आहे. बारकाईने पाहिल्यास आपल्या आजूबाजूला ऑनलाईन जुगार खेळणारे अनेक जण दिसून येतील इतके हे सार्वत्रिक झाले आहे. एकेकाळी उन्हाळी सुट्टीत आवर्जून खेळला जाणारा लहान मुलांचा बोर्ड गेम 'ल्युडो' हादेखील आता ऑनलाईन जुगाराच्या कक्षेत आला आहे. अशा ॲप्सवर नोंद केल्यानंतर सुरुवातीला मोठा 'कॅश बोनस' दिला जातो. जुगार खेळणारे सुरुवातीला काही पैसे जिंकतातही. हे जिंकलेले पैसे थेट त्याच्या खात्यात येतात. ऑनलाईन जुगाराची सवय लागते. त्याची परिणती व्यसनात होते. 'ईझी मनी'ची सवय लागते. मग हळूहळू या जुगार खेळाची 'शैली' बदलत जाते. आधी सहजपणे मिळणारे पैसे एकाएकी थांबतात. जुगाराच्या नादी लागलेले लोक पैसे जिंकण्यासाठी म्हणून आणखी खेळत राहतात आणि आणखी पराभूत होत जातात. पैसा गमावतात आणि मन:स्वास्थ्यही. 'ईझी मनी'च्या या व्यसनात आपण कधी कर्जबाजारी होतो ते लक्षातदेखील येत नाही. मग सुरू होते कर्जवसुली, भाईगिरी पद्धतीने. या दुष्टचक्रात अडकून कित्येकांनी आत्महत्या केल्या, याची कुठेही गणना होत नाही. या दुष्टचक्रात पुरुषांबरोबरच महाविद्यालयीन तरुण-तरुणी, विवाहित स्त्रिया, निवृत्त ज्येष्ठ नागरिकदेखील अडकत चालले आहेत, हे तर धक्कादायकच.

याची दुसरी खटकणारी बाजू अशी की, या सर्व प्रकाराला काहीही सामाजिक आणि राजकीय धरबंध नाही. अशा दुष्टचक्रात अडकलेले सर्व समाजाच्या डोळ्यांदेखत अडकवू दिले जात आहेत, असाच याचा अर्थ आहे. लोकप्रिय, प्रसिद्ध अभिनेते या ऑनलाईन जुगाराची जाहिरात अगदी खुलेआम करताना दिसतात. अशा अनेक जाहिरातींमधून अनेक कलाकार भरघोस मोबदला घेऊन काम करतात. पैशांसाठी या जाहिरातींमध्ये काम करणाऱ्या अभिनेत्यांना जबाबदार धरू नये, असे एखादे मत असू शकते. तरीही आपल्या लोकमानसावरील प्रभावाचा आपल्या 'या' दुकानदारीमुळे किती भयंकर दुष्परिणाम होत असतील, याची त्यांना कल्पना नाही, असे असूच शकत नाही. लोकांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या जुगाराच्या जाहिराती करताना या धनदांडग्या कलावंतांना जराही संकोच किंवा लज्जा वाटत नाही, हे आश्चर्यच आहे. प्रत्यक्ष जुगाराच्या अड्ड्यावर दलाली करणारे आणि जाहिराती करणारे हे कलावंत किंवा खेळाडू यांच्यात फरक तो कोणता, असे विचारावे वाटते. भारतातील काही राज्यांनी अशा ऑनलाईन खेळांवर बंदी घातली आहे. अशा जुगारी खेळांसाठी आपण जाहिरात करीत आहोत आणि काही लोकांना बरबाद करीत आहोत, हे त्यांनी लक्षात घ्यायलाच हवे. तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीमुळे जुगार आता बोटाच्या एका क्लिकवर अनिर्बंध खेळता येतो. जुगाराचे व्यसन, त्यातून वाढते कर्ज याचे दुष्परिणाम आता अनिर्बंध वाढू लागले आहेत आणि म्हणूनच या बाबतीत जाणकारांनी सामाजिक भान जागृत करण्याची गरज आहे. एकूणच या ऑनलाईन गेमिंगकडे भारत सरकारचे लक्ष आहे. २०२२ ते फेब्रुवारी २०२५ या काळात केंद्र सरकारने थोड्या थोडक्या नव्हे तर चक्क दीडेक हजार बेकायदेशीर बेटिंग, जुगार आणि गेमिंग साईट्स 'ब्लॉक' करून टाकल्या. आता या ऑनलाईन गेमिंगवर कडक आणि काटेकोर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे विधेयक आणले आहे. बेटिंग ॲप्स आणि सेलिब्रिटींच्या जाहिरातीमुळे भारतात मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याच्या पृष्ठभूमीवर केंद्रीय मंत्रिमंडळाने ऑनलाईन गेमिंग विधेयकाला मंजुरी दिली व ते लोकसभेत मंजूरही झाले. या प्रस्तावित कायद्याचा उद्देश भारतातील ऑनलाईन गेमिंग क्षेत्राचे नियमन करणे आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे होणारी सट्टेबाजी दंडनीय गुन्हा ठरवणे हे आहे. भारतात ऑनलाईन गेमिंग उद्योग २०१९ पर्यंत दुपटीने वाढून ९.१ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. या विधेयकामुळे गेमिंग उद्योग कायदेशीर चौकटीत येणार आहे. त्यातून फसवणुकीचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा आहे. या विधेयकात आर्थिक संस्थांना ऑनलाईन मनी गेमिंगसाठी पैसे ट्रान्सफर करण्यास मनाई केली जाणार आहे. या गेम्सच्या कलाकारांच्या जाहिरातींवरही बंदी येणार आहे. मात्र, ई स्पोर्ट्स आणि कौशल्यावर आधारित मोफत ऑनलाईन गेम्सना प्रोत्साहन दिले जाणार आहे. जिंकलेल्या रकमेवर ३० टक्के कर आणि ऑनलाईन गेमिंगवर २८ टक्के जीएसटी लावण्याची तरतूदही या विधेयकात आहे. त्यामुळे त्याचे स्वागत आणि त्याच्या कठोर अंमलबजावणीची अपेक्षाही.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# कृत्रिम प्रज्ञा साधेल व्यापक प्रसार

येत्या काळात एआयच्या क्षेत्रातील सगळ्यात मोठी प्रगती मशीन लर्निंग आणि डीप लर्निंगमध्ये होईल. यामुळे यंत्रे अधिक स्मार्ट होतील आणि मनुष्याच्या दृष्टीने 'स्वयंसिद्ध' कामे करू शकतील. जेएनआय आणि चॅटबॉट्स सर्वमान्य होतील. चॅट जीपीटी, डीपसीकमुळे अनेकांना याचे कुतूहल निर्माण झाले. भविष्यात एआयवर आधारित यंत्रणा स्वत: निर्णय घेऊ शकतील. हे विविध क्षेत्रांमध्ये, जसे की वैद्यकीय निदान, उद्योग, वित्तीय क्षेत्र आणि वाहतूक व्यवस्थापनात लागू होईल. एआयच्या मदतीने आरोग्यक्षेत्रात मोठे बदल होतील. स्वयंचलित रोगनिदान, वैद्यकीय उपचारांची अधिक अचूकता आणि आरोग्य सेवांचे प्रभावी वितरण अनुभवता येईल. मोदी सरकारने २०२४ मध्ये भारत एआय मिशन मंजूर केले गेले आणि त्यासाठी १०,३०० कोटी रुपयांची रक्कम निर्धारित केली. पुढील पाच वर्षांमध्ये हा निधी विविध भागांमध्ये भारत एआय मिशनच्या अंमलबजावणीसाठी वापरला जाणार आहे.

संगणक उत्पादक विक्रीसाठी सतत नवनवीन मार्ग शोधत असतात. कारण हा व्यूहात्मक धोरणाचा भाग असतो. अधिक यूजरफ्रेंडली उत्पादने जास्त वापरली जातात, विकली जातात हा साधा हिशेब असतो. यूजर इंटरफेस म्हणजे वापरकर्ता संगणकप्रणाली किंवा प्रोग्रामशी कसा संवाद साधू शकतो याचे शास्त्र. उदाहरणार्थ, वापरकर्त्यांना संगणक प्रोग्रामशी संवाद साधण्यासाठी माउस, कीबोर्ड आणि संगणक स्क्रीनची आवश्यकता असते. आता ध्वनी (ऑडिओ) आणि चलतचित्रे (व्हिडीओ) ही माध्यमे जास्त लोकप्रिय होत आहेत. त्याचबरोबर एखादे प्रोडक्ट अनेक देशांमध्ये सादर केले जाते तेव्हा स्थानिक परिभाषा, संस्कृती आदी घटक लक्षात घेतले जातात. यामुळे लँग टेक हा नवा प्रवाह उदयास आला आहे. जागतिक उत्पादनाचे स्थानिकीकरण (लोकलायझेशन) करणे हा एक मोठा व्यवसाय आहे. लँग टेक सेवांचे तीन भागात वर्गीकरण केले जाते- ब्रँड, वेबवरील माहिती, डिजिटल मार्केटिंगचा प्रयत्न आणि स्थानिक भाषेतील मजकुराचे स्थानिकीकरण; ज्यामुळे स्थानिक बाजारपेठेत विश्वास निर्माण होतो. यामध्ये वेबसाईट, ऑनलाईन मदत, व्हिडीओ (संवाद, मजकूर), चॅटबॉट्स, ऑनलाईन गेम्स (खेळ), ईआरपी सॉफ्टवेअरमधील यूजर इंटरफेस, रिपोर्ट्स या घटकांचा समावेश होतो. या सॉफ्टवेअर प्रकल्पांना स्थानिक भाषेचे ज्ञान, भाषांतर करणे, प्रणाली स्थानिकीकरण, त्यानुसार आवश्यक तंत्रज्ञान ही सर्व कौशल्ये आवश्यक असतात 'जनरेटिव्ह एआय' हे एक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आहे. ते मजकूर, प्रतिमा, संगीत आणि व्हिडीओ स्वरूपात नवी माहिती तयार करू शकते. 'जनरेट' या शब्दाचा अर्थ निर्मिती. 'जनरेटिव्ह एआय'चे प्रचलित उदाहरण म्हणजे चॅटबॉट्स, ज्यांनी जगात क्रांती आणली आहे.



मानवासारखा संवादात्मक मजकूर लिहिण्याच्या त्यांच्या क्षमतेबद्दल सर्व जण चकित आहेत. ज्या माहितीवर त्यांना प्रशिक्षित केले जाते त्यातून ते प्रथम पृथक्करण करतात आणि त्याचा निष्कर्ष म्हणजे अवघड कल्पना व्यक्त करू शकतात, जे मानवाला कदाचित लगेच जमले नसते. काही बाबतीत तर हे अशक्य ठरते. जनरेटिव्ह एआय ही संकल्पना मशीन-लर्निंग मॉडेल्सवर आधारित आहे. जी मानवी मेंदूसारखे कार्य करते. जनरेटिव्ह एआय चॅटबॉट्स आजकल खूप लोकप्रिय होत आहेत. हे चॅटबॉट्स मानवाप्रमाणेच संवाद साधू शकतात आणि विविध प्रकारच्या माहितीचे आदानप्रदान करू शकतात. माणसाला प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी काही वेळ लागू शकतो, तर चॅटबॉट्स त्वरित प्रतिसाद देतात. चॅटबॉट्स हे ग्राहक सेवा आणि व्यवस्थापन क्षेत्राचे भविष्य आहे.

हे तंत्र फक्त माहितीवर मर्यादित नसून ध्वनी, चित्र, चलचित्रही (व्हिडीओ) तयार करू शकते. जनरेटिव्ह एआय आश्चर्यकारकपणे वास्तववादी प्रतिमा तयार करू शकते, जे छायाचित्रांसारखे दिसते. या प्रतिमा मजकूर वर्णनावर आधारित किंवा साठवलेल्या डेटामधून प्रतिमा हाताळून तयार केल्या जाऊ शकतात. यामुळेच फेक व्हिडीओची समस्या निर्माण झाली आहे. मागल्या वर्षी हॉलिवूडमध्ये संवादलेखक (स्क्रिप्ट रायटर्स) संपावर जाण्यामागे एआयचा वापर हेही एक कारण होते. मराठी भाषेसंदर्भात एआय क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण कामे सुरू आहेत. यामुळे मराठी भाषा डिजिटल युगात अधिक प्रभावी होत आहे. ही कामे प्रामुख्याने नैसर्गिक भाषा प्रक्रिया या उपशाखेत मोडतात. भाषिणी हा भारत सरकारने सुरू केलेली एक राष्ट्रीय एआय भाषांतर मोहीम आहे. यात भारतीय भाषांमध्ये सामग्रीचे भाषांतर करण्यासाठी ३००+ पूर्वप्रशिक्षित एआय मॉडेल्स आहेत, ज्यात मराठीसाठीही सुविधा आहे. गुगल असिस्टंट, सिरी, एलेक्सासारख्या आवाज साहाय्यकांमध्ये मराठीतून संवाद साधता येतो. यामुळे वापरकर्त्यांना मराठीत विविध कार्ये सहज करता येतात. तसेच एआय आधारित भाषांतर साधने इंग्रजी आणि इतर भाषांमधील मजकुराचे मराठीत भाषांतर करण्यासाठी मदत करत आहेत.

सध्या अनेक कंपन्या आणि संस्था आपल्या चॅटबॉट्समध्ये मराठी भाषेचा समावेश करत असल्यामुळे मराठी भाषिकांना प्रश्नांची उत्तरे मिळवणे सोपे झाले आहे. चॅटजीपीटी, जेमिनी, परप्लेक्सिटीसारख्या मोठ्या भाषा मॉडेल्समध्ये मराठी मजकूर तयार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता विकसित केली जात आहे. यामुळे मराठीत लेख, कथा, कविता आणि इतर मजकूर तयार करणे शक्य झाले आहे. एआयचा वापर करून मराठीत शैक्षणिक साहित्य तयार केले जात आहे. खान अकॅडमीसारखी लोकप्रिय ॲप्स आता मराठीत उपलब्ध आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना सोप्या आणि आकर्षक पद्धतीने शिक्षण मिळवता येते. सीओईपी महाविद्यालयातील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषा विश्व नावाचा एक प्रकल्प तयार केला आहे, जो मराठी साहित्याचे संरक्षण आणि प्रचार करण्यासाठी मदत करतो. मराठी भाषेसाठी नैसर्गिक भाषा प्रक्रिया (एनएलपी) आणि इतर एआय संबंधित तंत्रज्ञानावर संशोधन सुरू आहे. यात मराठीतील बोलीभाषा समजून घेण्यावरदेखील भर दिला जात आहे. यामुळे मॉडेल्स मराठी भाषेच्या विविध पैलूंचा अभ्यास करून अधिक अचूक होतील. अनेक उद्योग एआय वापरत आहेत. काही शेतकरीसुद्धा या तंत्राचा फायदा घेत आहेत. येत्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये प्रवेश करेल आणि समाजातील सर्व क्षेत्रांना आकार देईल. या बदलांमुळे जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि सुरक्षित होईलच, परंतु त्याचबरोबर नवीन नैतिक, सामाजिक, आणि तंत्रज्ञानविषयक आव्हानेदेखील समोर येतील. एआयच्या वापरामध्ये नैतिक मुद्दे आणि सामाजिक आव्हाने येऊ शकतात. त्यात डेटा गोपनीयता, निर्णयाच्या परिणामांची जबाबदारी महत्त्वाची असेल. फेक माहिती तयार करणे आणि पसरवणे अनैतिक आहे. दुर्दैवाने इथे सायबर कायदे अधिक प्रभावी करायची गरज आहे. हे भविष्य ध्यानात घेऊन शिक्षणक्रम, ते शिकवणाऱ्या संस्था आणि त्यांच्या शिकवण्याच्या पद्धती यामध्येही कालानुरूप बदल व्हायला हवेत. यातून शाळकरी मुले-मुली आणि महाविद्यालयीन युवा पिढीतील कल्पकता आणि नवनिर्मितीच्या ईर्ष्येला प्रोत्साहन मिळाले पाहिजे कारण अशाच व्यक्ती चाकोरीबद्ध कामांवर अवलंबून न राहता स्वत:ला आणि समाजाला पुढे नेऊ शकतील. म्हणजेच बदल समजून घेणे आणि आत्मसात करणे हे एक कठीण काम एकविसाव्या शतकात जन्मलेल्या पिढीला करावे लागणार आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# नैतिक मूल्यांची शिकवण दृढ व्हावी

भारतीय संस्कृतीत महिलांना पूर्वीपासूनच पूजनीय स्थान आहे. नवरात्रीचे नऊ दिवस तर स्त्रीच्या विविध रूपांची आराधना येथील समस्त समाज करीत असतो. एवढेच नव्हे तर 'नारी तू नारायणी' यावर श्रद्धा असलेला आमचा समाज, संस्कृती आहे. या संस्कृतीत जेवढे राष्ट्राचे रक्षण महत्त्वाचे मानले गेले तेवढीच महत्त्वाची महिलांची सुरक्षा देखील मानली गेली. महिलांचा सन्मान, सुरक्षेसाठी प्रसंगी प्राणपणाने संघर्ष केल्याची अनेक उदाहरणे इतिहासात सापडतील. पण ही संस्कृती असणाऱ्या समाजातच महिला सुरक्षेविषयीची काळजी वाटावी अशा घटना सातत्याने घडताना दिसतात. मग स्वाभाविकच सामान्य सज्जनांचा संताप होतो. काही प्रसंगी हा सात्त्विक संताप सामूहिकरीत्या व्यक्त होतानाही दिसून येतो. त्या-त्या वेळी अनेक जण नानाविध प्रश्न देखील व्यवस्थेला विचारतात. यात प्रामुख्याने रोष व्यक्त होतो तो कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या शासनावर आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे दायित्व असलेल्या पोलिस प्रशासनावर. खरं म्हणजे हा संताप योग्यच. पण एकीकडे मातृ पूजनाची परंपरा जपणारा, नवरात्रीचे नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची आराधना करणारा समाज, तर दुसरीकडे त्याच समाजात असणारी काहींची विकृत मनोवृत्ती हा विरोधाभास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा, कारणांचा आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचा समाजातील सर्वच घटकांना विचार करावा लागणार आहे. केवळ शासन आणि पोलिस प्रशासन यांच्यावर ही जबाबदारी ढकलून नामानिराळे निश्चितच होता येणार नाही.

महिलांवर विविध प्रकारच्या अत्याचाऱ्यांचे वृत्त नित्याचेच झाले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या २०२२ सालच्या अहवालानंतर देशात दररोज ८६ बलात्काराच्या घटनांची नोंद करण्यात आली. अर्थात दर १६ मिनिटांनी एका महिलेवर बलात्कार झाल्याचा गुन्हा नोंदविला गेला. यात आणखी वेदनादायी म्हणजे दर तीन दिवसांनी दोन महिलांची बलात्कारानंतर हत्या केल्या गेली. तर २०२४ सालात महिलांवरील अत्याचारांचे ४६,४५९ गुन्हे नोंदविण्यात आले. यात ७,९४० बलात्कार, ८८३ अपहरण, हुंडाबळी १३९, पती व नातलगांकडून क्रूर कृत्य १०,५३९, विनयभंग व लैंगिक छळ १७,६७१ आदींचा समावेश आहे. यातील दोषसिद्धीचे प्रमाण महाराष्ट्रात सुमारे ३४.३ टक्के इतके आहे.

२०२३ च्या तुलनेत २०२४ साली महिला अत्याचारांच्या प्रमाणात काहीशी घट झाली असली तरी ही आकडेवारी देखील मन सुन्न करणारी आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी अनेक कायदे आहेत. परिस्थितीनुरूप हे कायदे अद्ययावत आणि आणखी कठोर करण्यात आले. महिलांना अत्याचार, हिंसा, छळ आणि भेदभावांपासून संरक्षण देणे हा या कायद्यांचा उद्देश. केंद्र, राज्य शासनात महिला आणि बाल कल्याण विकास हे महत्त्वाचे मंत्रालय देखील महिलांच्या विकास आणि संरक्षणासाठी आहे. पण असे असताना देखील दिवसेंदिवस महिलांवरील वाढणारे अत्याचार आणि अत्याचार करणारी विकृत मानसिकता समाज व्यवस्थेसमोर प्रश्न म्हणून उभी आहे म्हणूनच केवळ कायदा, शासन, पोलिस प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांनीच याबाबतचा विचार करणे पुरेसे ठरणार नाही तर या समस्येच्या मुळाशी जाऊन समाजव्यवस्थेत नेमकी काय चूक होत आहे याचाही विचार करणे आवश्यक ठरेल. यासाठी समाजातील सज्जनशक्तीने पुढाकार घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

मातृ पूजनाची परंपरा, बहिणीच्या रक्षणाचे बंधन उत्सव म्हणून साजरा करणारी आमची संस्कृती. पण तरीही ही विकृती का वाढतेय् याचा विचार करता अनेकानेक कारणे समोर येतात पण मुख्यतः कालौघात समाजव्यवस्थेत आणि त्यातही कुटुंब व्यवस्थेत होत असलेले बदल अनेक प्रश्न निर्माण करणारे असल्याचे मत समाज शास्त्रज्ञांचे आहे. पूर्वी कुटुंबातून होणारा संस्कार, कुटुंबातील घटकांचा नैतिक धाक हा क्षीण झाला आहे. त्यातच समाजमाध्यमांच्या अतिरेकी, अविवेकी वापराला वयाचे बंधन नसल्याचे दिसून येते. विविध समाजमाध्यमातून नको त्या बाबी पाहण्याचा छंद अनेकांना कळत्या-नकळत्या वयात लागला आहे. त्यातून उद्दीपित होणाऱ्या भावना देखील समाजातील या विकृतीला कारणीभूत आहेत. पण मुख्यतः कुटुंब व्यवस्थेतून होणारा संस्कार, नैतिक मूल्यांची रुजवण ही सैल झाल्याचे देखील महत्त्वपूर्ण कारण या समस्येचा खोलवर विचार करता समोर येते. म्हणूनच कायद्याने त्याचे काम चोख करावेच, न्याय व्यवस्थेने कुणाचीही गय करू नये पण समाजातील कुटुंब संस्कार, नैतिक मूल्यांची शिकवणूक ही परंपरागत व्यवस्था दृढ व्हावी यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक आणि राधाकृष्णन्

रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार चंद्रपुरम पोन्नुस्वामी (सी. पी.) राधाकृष्णन् यांनी बुधवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना रालोआने पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात जे शक्तिप्रदर्शन केले, त्यावरून राधाकृष्णन् यांचा विजय १०० टक्के निश्चित आहे. इंडिया आघाडीने राधाकृष्णन् यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर केली आहे. रेड्डी गुरुवारी म्हणजे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अर्ज भरू शकतात. उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार जाहीर करण्यात तसेच उमेदवारी अर्ज भरण्यात रालोआने बाजी मारली. यात इंडिया आघाडी माघारली आहे. इंडिया आघाडीला आपला उमेदवार लवकर जाहीर करता आला नाही तसेच त्याचा उमेदवारी अर्ज दाखल करायलाही त्यांनी वेळ घेतला. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत दूरचा विचार करत भाजपाने राधाकृष्णन् यांची उमेदवारी जाहीर केली आहे. या निवडणुकीत यावेळी दक्षिण भारताचा उमेदवार देत भाजपाने एकाच दगडात अनेक पक्षी मारलेत. राधाकृष्णन् कौंडर जातीचे आहेत. ही जात ओबीसीत येते. तामिळनाडूत सत्तारूढ असलेल्या द्रमुकचे राजकारण ओबीसी केंद्रित आहे. त्याला छेद देण्यासाठी भाजपाने राधाकृष्णन् यांची उमेदवारी जाहीर केली, असे दिसते. राधाकृष्णन् उपराष्ट्रपतिपदावर निवडून आल्यानंतर त्याचा फायदा भाजपाला फक्त तामिळनाडूतच नाही, दक्षिण भारतातील सर्व राज्यांत मिळू शकतो. तेलगू देसम, जनकल्याण समिती अशा सर्व पक्षांचा पाठिंबा असला, तरी जे रालोआत नाही, मात्र दक्षिण भारतात ज्यांचा चांगला राजकीय प्रभाव आहे, अशा वायएसआर काँग्रेस आणि भारत राष्ट्र समिती यांनीही राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे.

यावेळची उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक आणखी एका राज्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे, ते म्हणजे झारखंड. राष्ट्रपती होण्यापूर्वी द्रौपदी मुर्मू झारखंडच्या राज्यपाल होत्या, तर आता उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन्ही महाराष्ट्राचे राज्यपाल होण्याआधी झारखंडचे राज्यपाल होते. त्यामुळे झारखंडच्या राज्यपालपदाला येत्या काळात महत्त्व आले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मूळ तामिळनाडूचे असलेले राधाकृष्णन् यांची ओळख २०१३ मध्ये एका तामिळ चॅनेलवरील चर्चेत 'तामिळनाडूचे मोदी' अशी करून देण्यात आली होती. मोदी यांच्याप्रमाणेच तामिळनाडूत स्वच्छ प्रतिमेचा राजकारणी अशी त्यांची प्रतिमा आहे. १९९८ आणि १९९९ मध्ये ते तामिळनाडूच्या कोईम्बतूर मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले होते. २००४, २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला, तर २००९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी लढवलीच नव्हती. २००४ ते २००७ या काळात तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी प्रभावीपणे काम केले. २०२३ मध्ये त्यांना झारखंडचे राज्यपाल करण्यात आले. वर्षभरातच त्यांना महाराष्ट्रात पाठविण्यात आले. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीतील संख्याबळाचा विचार करता राधाकृष्णन् यांचा विजय हा निश्चित आहे; फक्त ते किती मतांनी विजयी होतात, एवढाच प्रश्न आहे.

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत आतापर्यंत चार वेळाच निवडणूक अविरोध झाली. १९५२ मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् अविरोध विजयी झाले. १९५७ मध्ये त्यांची पुन्हा या पदावर अविरोध फेरनिवड झाली. १९७९ मध्ये न्या. मोहम्मद हिदायतुल्ला यांची तर १९८७ मध्ये डॉ. शंकरदयाल शर्मा यांची उपराष्ट्रपतिपदी अविरोध निवड झाली. १९८७ नंतर २०२५ पर्यंत एकाही उपराष्ट्रपतीची अविरोध निवडणूक होऊ शकली नाही. यावेळी सी. पी. राधाकृष्णन् यांची निवडणूक अविरोध व्हावी, असा प्रयत्न भाजपाने केला, पण त्याला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी प्रतिसाद दिला नाही. उलट इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयातील माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर करीत निवडणुकीसाठी दंड थोपटले आहे.

उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन् हे देशातील दुसरे राज्यपाल ठरणार आहेत. याआधी ज्येष्ठ भाजपा नेते आणि राजस्थानचे माजी मुख्यमंत्री भैरोसिंह शेखावत आणि जगदीप धनकड उपराष्ट्रपती झाले होते. उपराष्ट्रपती होण्याआधी शेखावत राजस्थानचेच राज्यपाल होते, तर जगदीप धनकड पश्चिम बंगालचे. धनकड यांच्या राजीनाम्यामुळेच यावेळी उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक होत आहे.

इंडिया आघाडीनेही सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी जाहीर करीत भाजपाला शह देण्याचा प्रयत्न केला आहे. भाजपाने दक्षिण भारतीय उमेदवार दिल्यानंतर इंडिया आघाडीनेही दक्षिण भारतीय उमेदवार देत या निवडणुकीतील चुरस वाढविली आहे. रालोआच्या राजकीय उमेदवाराच्या तुलनेत इंडिया आघाडीने गैरराजकीय आणि संविधान तज्ज्ञ असा उमेदवार दिला आहे. सुदर्शन रेड्डी यांच्या उमेदवारीमुळे तामिळ आणि दक्षिण भारतीय अस्मिता या निवडणुकीत पणाला लागणार आहे. तेलगू देसम हा रालोआचा घटक पक्ष असल्यामुळे राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याच्या त्याच्या निर्णयात बदल होण्याची कोणतीच शक्यता नसली, तरी वायएसआर काँग्रेस आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांमध्ये द्विधा परिस्थिती निर्माण होऊ शकते. खरं म्हणजे या दोन्ही पक्षांनी राधाकृष्णन् यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला आहे. उपराष्ट्रपतिपदावर विराजमान होणारे राधाकृष्णन् हे या नावाचे दुसरे नेते ठरणार आहेत. याआधी १९५२ मध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् उपराष्ट्रपतिपदी अविरोध विजयी झाले होते. १९५७ मध्ये त्यांची या पदावर फेरनिवड झाली होती. त्यानंतर जवळपास ६८ वर्षांनी सी. पी. राधाकृष्णन् उपराष्ट्रपती होत आहेत. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचे यावेळचे आणखी एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यावेळी रिंगणात असलेले दोन्ही उमेदवार भगवान श्रीकृष्णाशी संबंधित आहेत. रालोआच्या उमेदवाराचे नावच राधाकृष्णन् आहे, तर इंडिया आघाडीच्या उमेदवाराच्या नावात सुदर्शन आहे. गंमत म्हणजे भाजपाने गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशीच राधाकृष्णन् यांची उमेदवारी जाहीर केली. काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीने यावेळी उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने सुदर्शन आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न केला आहे. पण सुदर्शन चक्र हे भगवान श्रीकृष्णाच्या हाताताच शोभत असते, श्रीकृष्णापासून सुदर्शन चक्र वेगळे करता येत नाही. श्रीकृष्णाच्या हातात आहे, तोपर्यंतच सुदर्शन चक्रात दैवी ताकद असते. दुसऱ्याच्या हातात गेल्यानंतर ते फक्त चक्रच उरते आणि ज्याच्या हातात आहे, त्याला फक्त चकराच येत असतात. त्यामुळे यावेळी होणारी उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक अतिशय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या निवडणुकीच्या निकालाचा भारताच्याच नाही तर 'महाभारता'च्या राजकारणावर दूरगामी परिणाम होणार आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### कमकुवत मनाने कुटुंबातील प्रेम कमी होत आहे

आजच्या काळात सर्वांत मोठं दुःख म्हणजे कुटुंबातील कमकुवत मनाचे नाती तुटताना दिसत आहेत. रक्ताचे नाते असूनही लोकांमध्ये दुरावा वाढतो आहे. यामागे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे कमकुवत मन. एकेकाळी घर कुटुंब म्हणजे प्रेम, आपुलकी, सहनशीलता आणि एकमेकांसाठी त्याग करण्याची शिदोरी असायची. मतभेद झाले तरी कुटुंबातील लोक तोल सांभाळायचे. पण आता मात्र मनाची ताकद कमी झालेली दिसते. छोटीशी टीका, थोडासा अपमान, थोडं मतभेद यामुळे लोक लगेच दुखावतात. मन मजबूत नसल्याने ते सहन होत नाही आणि अखेर ते नाते तुटण्यामध्ये बदलते. आजचा माणूस जास्त स्वकेंद्रित झाला आहे. माझं म्हणणं खरं, माझ्या मनासारखं झालं पाहिजे या हट्टामुळे नाती ताणली जातात. सहनशीलता आणि समजूतदारपणा कमी झाल्याने नात्यांचा पूल तुटतो. कमकुवत मनाचे परिणाम थोड्याशा गैरसमजातून वाद निर्माण होतात. राग, द्वेष, मत्सर या भावना निर्माण होऊ लागल्या आहेत.

संवादाऐवजी शांतता आणि टाळाटाळ वाढते. त्यामुळे एकत्रित असणारे अखेरीस विभक्त होण्याची वेळ येते आहे. कुटुंब प्रेम एक झाड आहे, आणि प्रत्येक नातं त्याची फांदी आहे. जर मन कमकुवत झालं, तर फांद्या तुटत जातील. पण मन मजबूत ठेवलं, तर कुटुंबातील प्रेमाची सावली कायम राहील.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

### शालार्थ घोटाळा : दोषारोपांची संगीत खुर्ची

मराठी आणि ग्रामीण शाळांनी दशकानुदशके लाखो विद्यार्थ्यांना परवडणारे शिक्षण दिले, पण आज त्याच शाळा शालार्थच्या घोटाळ्यात गोवल्या गेल्या आहेत. सुरुवातीला शिक्षण विभागावर संशय, मग सचिव, शाळा समित्या, मुख्याध्यापक, शिक्षक अशी ही दोषारोपांची संगीत खुर्ची! तपासाचा व्हायचा तो उद्देशच बदलून सर्वांनी आपली खुर्ची वाचवण्याचा खेळ सुरू आहे. शिक्षकांचे पगार थांबवले, अटकेसाठी मुख्याध्यापकांना पकडले, पण खरा गाभा जे अधिकारी आयडी बनवतात, मंजुरी देतात आणि गैरव्यवहारास मोकळीक देतात त्यांच्यापर्यंत कोणीच पोहोचत नाही. आज नागपूर विभागातच २० अटक झाल्या, पण इतर जिल्हे अजून रडारवर नाहीत. ग्रामीण शिक्षण घडवणाऱ्या संस्थांवर संपत्ती जप्तीची धमकी, तर वास्तविक जबाबदारी असलेले प्रशासक मात्र सुरक्षित! हे दुष्टचक्र थांबवण्यासाठी शिक्षक, पालक व शाळा व्यवस्थापनांनी एकत्र येऊन 'खरे दोषी कोण?' असा सवाल करणे गरजेचे आहे. नाहीतर शिक्षणाची मुळे खोदणारे सुटत राहतील आणि मुलांपर्यंत ज्ञान नेणाऱ्या या शाळांवर कलंक लागवत राहील.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षणाचा विस्तार होणे आवश्यक

आपल्या भारतीय समाजात समानता आणण्यासाठी शिक्षणाचे सरकारीकरण, विनामूल्य व सक्तीचे शिक्षण आणि समान शाळा पद्धती ही तीन तत्त्वे किती महत्त्वाची आहेत, हे म. जोतिराव फुले यांनी अधोरेखित केले. म्हणून त्यांनी सर्वांसाठी शिक्षण आणि समतावादी समाज निर्मितीचा पुरस्कार केला. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील सामाजिक भान जोतिराव फुलेंच्या विचारात प्रकर्षाने दिसून येते. वर्ण आणि जातिव्यवस्थेने समाजाची विभागणी शोषक आणि शोषित अशा दोन भागांत केली. शोषक जाती व शोषित जातींमध्येही उपविभागणी असल्याने, शोषित जात किंवा वर्ग म्हणून एकजुटीने उभे राहिले नाहीत. स्पृश्य जातींमध्ये अनेक जाती आहेत. त्यांचे व्यवसाय, रीतिरिवाज आणि परंपरा एक नाहीत. तसेच अस्पृश्य जातींमध्येही अनेक जाती असून त्यांच्यात उच्च-नीचतेची धारणा काम करते. शोषणातून मुक्तीसाठी सर्व शोषित जातींना एकत्वाने भान देणे आवश्यक होते. हे एकत्वाचे भान शिक्षणातून देता येऊ शकते यावर महात्मा फुलेंचा अगाध विश्वास होता.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात मुख्यतः तीन तत्त्वे दडलेली आहेत. पहिले तत्त्व म्हणजे शिक्षण सरकारी असले पाहिजे. सरकारी शिक्षणातूनच सार्वत्रिकीकरण साध्य करता येऊ शकते. सरकारी शिक्षणाचा यांत्रिक रथ महात्मा फुलेंना अभिप्रेत नव्हता. सरकार स्वतःच विषमतावादी आहे व विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जोपासते, हे त्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने शिक्षण विस्तार संकुचित करण्याची व शाळाबंदीची भूमिका घेतली आहे. ग्रामीण भागातील, शहरी झोपडपट्टीतील व निम्न मध्यमवर्गीय यांची प्राथमिक शिक्षणातून हकालपट्टी होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा प्रश्न तीव्र व बहुपदरी झाला आहे. सार्वत्रिकीकरण साध्य करण्यासाठी समान शाळा पद्धतीचा पुरस्कार व महात्मा फुलेंच्या विचारांची नितांत गरज आहे. सर्वांना शिक्षण मिळावे इथेच ते थांबत नाहीत, तर शिक्षण कशासाठी व कोणते हा मार्मिक प्रश्न ते उपस्थित करतात.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# भव्य अमृत मेळाव्याचा तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

माजलगाव येथे दि. २३ ऑगस्ट रोजी भव्य 'अमृत मेळावा'शिक्षण, कौशल्य आणि व्यवसाय संधींचा अद्वितीय संगम माजलगाव (जि. बीड) -महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने शनिवार, २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता वैष्णवी मंगल कार्यालय, गजानन मंदिर रोड, माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्राचे' आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात ब्राह्मण, मारवाडी, आर्य वैश्य (कोमटी), गुजराती, राजपूत, माहेश्वरी, राजपुरोहित, सिंधी, बनिया, बंगाली, पाटीदार आदी खुल्या प्रवर्गातील समाजासाठी अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, कौशल्य विकास आणि उद्योग उभारणीसाठीच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे.मेळाव्यात UPSC/ MPSC पूर्व परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहन अर्थसहाय्य, IIT, IIM², -IIMS, IIIT सारख्या उच्च शिक्षण संस्थांसाठी सहाय्य, IGTR, CIPET, NIELIT, C-D-C यांसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांचे कौशल्य विकास कोर्सेस पूर्णपणे विनामूल्य, व्यक्तिमत्त्व विकासासाठी चघउङ चा अमृत कलश कोर्स व किशोर विकास उपक्रम, तसेच तरुणांसाठी बेकरी, सुर्यमित्र,इम्पोर्ट-एक्स्पोर्ट यांसारखी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

याशिवाय व्यवसाय कर्जावर व्याज परतावा या योजनांचा लाभही मिळणार आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) मार्फत अमृतच्या लाभार्थ्यांना मोफत स्वयंरोजगार प्रशिक्षण उपलब्ध होणार असून त्यासाठी नोंदणी व मार्गदर्शन या मेळाव्यात केले जाईल. याशिवाय लहानात लहान स्वदेशी उत्पादन व सेवा जगभर पोहोचविण्यासाठी अमृत पेठ या महत्वाकांक्षी उपक्रमाची माहिती व नोंदणीही या मेळाव्यात होणार आहे.या कार्यक्रमास अमृत संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रवीण पांडे, माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर व राज्य समन्वयक दीपक जोशी उपस्थित राहणार आहेत.हा मेळावा शिक्षणापासून व्यवसायापर्यंत आत्मनिर्भरतेकडे नेणारे एक भक्कम पाऊल ठरणार असून खुल्या प्रवर्गातील तरुणांसाठी ही सुवर्णसंधी आहे. समाजातील सर्व नागरिक व तरुणांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक विशाल अशोकराव जोशी यांनी केले आहे.

# सावरकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी बनवल्या पर्यावरण पूरक गणेश मूर्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

येथील सावरकर महाविद्यालयामध्ये सांस्कृतिक विभागाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे यांच्या हस्ते झाले. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणाले की पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करून आपण पर्यावरणाचे संवर्धन करतो. या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो यातूनच भविष्यात चांगले मूर्तिकार तयार होतील असे ते म्हणाले. सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख डॉ. रूपाली कुलकर्णी म्हणाल्या की या कार्यशाळेमध्ये बनवलेल्या पर्यावरण पूरक मूर्तींची स्थापना प्रत्येक विद्यार्थी आपल्या घरी करणार असल्याने यातून पर्यावरण पूरक गणेश उत्सवाचा संदेश समाजात जाईल. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, कार्यशाळेतील प्रशिक्षक डॉ. जोगेंद्र गायकवाड, कु. हर्षदा मोरे , भूगोल विभाग प्रमुख डॉ.अशोक डोके यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत बीड शहरातील चंपावती विद्यालय, संस्कार विद्यालय, सावरकर विद्यालय, सहकार



विद्यामंदिर, गुरुकुल इंग्लिश स्कूल, श्री श्री रविशंकर इंग्लिश स्कूल, नारायणा इ टेक्नो स्कूल, भगवान विद्यालय, किडझी इंग्लिश स्कूल, पोद्दार इंग्लिश स्कूल या शाळांमधील एकूण ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आकर्षक गणेश मूर्ती बनविल्या. सांस्कृतिक विभाग सदस्य श्री. अनंत देशपांडे, श्रीमती दीपा देशपांडे, डॉ. प्रशांत तालखेडकर , प्रा. आसावरी राऊत,श्री अभय पांडव आणि सर्व शिक्षकेतर वर्गाने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.

# बँकेच्या कर्जास जामीन राहण्यास भाग पाडून प्राध्यापक मित्राची फसवणूक

## कर्ज बुडविणाऱ्या माधव सोनवणे यास कर्ज परतफेडीचे न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२० ऑगस्ट**

मित्राला बँकेच्या कर्जासाठी जामीन घ्यायला लावून कर्जाच्या रकमेची परतफेड न करता प्राध्यापक मित्राला बँकेच्या कर्जाचे हप्ते पगार रकमेतून भरावयास लावून ४ लाख २० हजार रुपयाला फसविले. शेवटी कर्जाच्या परतफेडीची रक्कम वसूल करण्यासाठी प्राध्यापक मित्राला राजकारणी असलेल्या मित्रा विरुद्ध न्यायालयात दावा दाखल करणे भाग पडले. प्राध्यापक मित्राचा दिवाणी दावा येथील दिवाणी न्यायालयाने मंजूर करून कर्जाच्या परतफेडचे एकूण रक्कम रुपये ४,२०,०००/ दाव्याच्या तारखेपासून ६% वार्षिक दराने व्याज व दाव्याच्या खर्चासह मंजूर करून निकालाच्या तारखेपासून ९० दिवसाच्या मुदतीच्या आत प्राध्यापक मित्राला परत करण्याचा आदेश राजकारणी मित्राविरोधात दाव्याच्या निकाल पत्रात पारित केला आहे.

मुळचे मुशिराबाद जिल्हा लातूर येथील रहिवासी असलेले जयप्रकाश अविनाश मलवाडे हे येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, येथील कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरीस आहेत. माजलगाव येथील राजकारणी असलेले महादेव उर्फ माधव पिता सर्जेराव सोनवणे यांच्याशी त्यांचा परिचय झाला. यातूनच माधव सोनवणे यांना शाहूनगर भागात नवीन घराच्या बांधकामासाठी आर्थिक कर्ज पाहिजे असल्याने त्यांनी येथील सांगली अर्बन बँकेमध्ये इसवी सन २०१७ साली ५ लाख रुपयाच्या कर्जाची मागणी केली असता सांगली बँकेने कर्जासाठी तीन ऐपतदार जामीनदाराच्या जामिनीची मागणी करून तीन जामीनदारांपैकी एक जामीनदार हा शासकीय सेवेतील पगारदार असावा व त्यांचे पगार पत्र जामिनीसाठी तारण म्हणून देण्याची अट ठेवली. त्यावर माधव सोनवणे च्या आग्रहाखातर व विनवणीनुसार प्रा. मलवाडे यांनी सांगली बँकेत सोनवणे यांच्या कर्ज प्रकरणात जामीन घेतली व बँकेने माधव सोनवणे यांना ५ लाख रुपये कर्ज डिसेंबर, २०१७ मध्ये वितरित केले. सदर कर्जाची परतफेड माधव सोनवणे यांनी ३० हजार रुपयांच्या मासिक हप्त्यामध्ये करावयाची होती. परंतु माधव सोनवणे यांनी कराराप्रमाणे परतफेडीचे मासिक हप्ते बँकेकडे जमा न केल्याने बँकेने माधव सोनवणे आणि त्यांच्या जामीनदारांना कर्ज फेडीच्या नोटीसा पाठवून संबंधितांनी रक्कम जमा न केल्याने उपनिबंधक सहकारी संस्था ( परसेवा) संभाजीनगर यांच्या न्यायालयात कर्ज वसुलीचा दावा दाखल केला. तो दावा एकतर्फा मंजूर होऊन सहकार न्यायालयाने बँकेला कर्जदार व जामीनदाराच्या स्थावर व जंगम मालमत्ता विक्री करून रक्कम वसुलीचे प्रमाणपत्र जरी केले. त्यावरून बँकेने सोपी व सरळ पायवाट म्हणून कर्जदार माधव सोनवणे व इतर दोन जामीनदारांच्या मालमत्ता जप्त न करता पगारदार नोकरदार असलेले जमीनदार प्रा. मलवाडे यांच्या मासिक पगारातून प्रतिमाहा ३० हजार रुपये कपात करून बँकेत जमा करण्याचे आदेश सुंदराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य यांना दिले. त्यावरून महाविद्यालयाने प्रा. मलवाडे यांच्या १४ वेळा मासिक पगारातून प्रतिमहा ३० हजार प्रमाणे कपात करून एकूण ४ लाख २० हजार रुपये बँकेतील माधव सोनवणे यांच्या कर्ज खात्यात जमा केली. या प्रकारे बँकेने कर्जाच्या रकमेपैकी फार मोठी रक्कम जामीनदार प्रा. मलवाडे यांच्याकडून वसूल केली.

प्रा. मलवाडे यांनी माधव सोनवणे यांचेकडे सदर रकमेची वारंवार मागणी करूनही माधव सोनवणे यांनी ती रक्कम प्रा. मलवाडे यांना अदा न केल्याने प्रा. मलवाडे यांनी वकील ॲड. शिवप्रसाद शर्मा यांच्यामार्फत रकमेच्या मागणीची नोटीस माधव सोनवणे यांना पाठवून रकमेच्या वसुलीसाठी येथील मा. दिवानी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) माजलगाव यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा दाखल केला. सदर दाव्यामध्ये वादी प्रा. मलवाडे प्राचार्य डॉ. गोवर्धन सानप व बँकेचे मॅनेजर श्री. अनिल परळीकर यांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या माधव सर्जेराव सोनवणे हे दाव्याचे समन्स प्राप्त होऊनही प्रकरणात हजर न झाल्याने न्यायालयाने प्रा. मलवाडे यांचा दावा प्रतिवादी माधव सोनवणे याच्या विरोधात एकतर्फी मंजूर केला व तीन महिन्याच्या आत दाव्याची रक्कम ४ लाख २० हजार रुपये ६% वार्षिक व्याजाच्या रकमेसह तसेच दाव्याचा खर्च देण्याचा आदेश पारित केला आहे.

# देवाभाऊंसाठी पाठवलेल्या राख्यांच्या संकलनासाठी आमदार लोणीकर अंबाजोगाईमध्ये

**लोणीकरांनी जागवल्या मुंडे – महाजनांच्या आठवणी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह अन् टाळ्यांचा कडकडाट**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

भारतीय जनता पार्टी हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असून सर्व सामान्य शाखाध्यक्ष पासून देशाच्या राष्ट्रीय अध्यक्ष च्या पदापर्यंत व सर्व सामान्य ग्रामपंचायतच्या सदस्या पासून देशाच्या पंतप्रधानापर्यंत आपल्या कार्य कौशल्याच्या बळावर पोहोचण्याची ताकद केवळ भारतीय जनता पक्षामध्ये आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाची ताकद आणि प्राण कार्यकर्ता आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर भाजपा जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. याच प्रतिभावान, जिवलग व बलाढ्य कार्यकर्त्यांच्या बळावर



स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे व प्रमोद जी महाजन यांनी महाराष्ट्रात पक्ष उभा केला त्यामुळे भविष्यात देखील काम करणाऱ्या कार्यकर्त्याला बळ देणारा केवळ एकमेव पक्ष असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

आंबेजोगाई येथे बीड जिल्ह्यातील माझा भाऊ, देवा भाऊ या उपक्रमांतर्गत राख्यांचे संकलन कार्यक्रम प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी मंचावर ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, युवा नेते अक्षय मुंदडा, राम कुलकर्णी भाजपा महिला जिल्हाध्यक्ष उषा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे व प्रमोद महजन यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीतील नेत्यांची फळी निर्माण झालेली आहे. तळागाळातील सर्व सामान्य व्यक्तीपर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या योजना पोहोचविण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सदैव तत्पर असतात. १ राखी पंकजाताईंनी प्रत्यक्ष 'देवाभाऊ' यांना बांधलेली आहे तर बीड जिल्ह्यातून पहिल्या टप्प्यात जमा झालेल्या १५५७० राख्या आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोच करणार आहोत असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

# जीवनातील गेलेला क्षण पुन्हा येत नाही पण छायाचित्राकार हा छायाचित्राच्या माध्यमातून तो क्षण कायम टिकून ठेवतो-शंकर देशमुख

**भाजपच्या वतीने कडा येथील छायाचित्रकारांचा सत्कार संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**कडा दि.२० ऑगस्ट**

जीवनातील गेलेला क्षण पुन्हा येत नाही पण छायाचित्राकार हा छायाचित्राच्या माध्यमातुन तो क्षण कायम टिकून ठेवतो जागतिक छायाचित्रकार दिना निमित्ताने बोलताना बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले. जागतिक छायाचित्रकार दिना निमित्ताने भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या वतीने कडा शहरातील छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला. कडा येथील भाजपा कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल भंडारी, अमोलक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा, राजु शिंदे , दिलीप परदेशी, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब देशमुख, अशोक पवळ, वेदांत देशमुख, रमेश भोजने, हरिश्चंद्र बोडखे, पत्रकार दिगंबर बोडखे, राजेंद्र जैन, अशोक खंदारे, महेश पवळ व इतर उपस्थित होते.

प्रारंभी फोटोग्राफर ढोले यांच्याकडील अत्यंत जुन्या काळातील व सध्या असणाऱ्या अशा दोन्ही कॅमेरांची पुजा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.सुरुवातीला कडा येथील जेष्ठ फोटोग्राफर अरुण ढोले यांचा



सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सागर ढोले,अतुल ढोले, विशाल इथापे, अशोक कुमखाले, विशाल ढोले, अंबादास जगताप, रोहन बेल्हेकर, उमेश कव्हले, किरण शिंदे, प्रेमराज साळवे, कृष्णा अब्दार, रोहित क्षीरसागर, गायकवाड, राहुल ढोले, संस्कार पगारे, शुभम साके, अंकूश चव्हाण, साठे, कांबळे व इतर उपस्थित छायाचित्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाबुलाल भंडारी, हेमंत पोखरणा यांची शुभेच्छापर भाषणे झाली.भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी सांगितले की, छायाचित्रकार हा सर्वसामान्य माणसापासून ते अति महत्वपूर्ण अशा व्यक्तींचे महत्त्वाचे क्षण कॅमेरा मध्ये बंदीस्त करण्याचे काम करतात.माणसाच्या आयुष्याची आठवणी कायम स्मरणात राहतील असे महत्वाचे क्षण टिपण्याचे प्रयत्न करतात तसेच निसर्ग चित्र सजिव वाटतील असे काम छायाचित्रकार करतात. त्यांचे हे काम खरोखरच कौतुकास्पद आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सागर ढोले यांनी केले.

# आरोग्य कर्मचाऱ्यांचा तिसऱ्या दिवशीही संप सुरुच,तालुक्यातील आरोग्य सेवा विस्कळित

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२० ऑगस्ट**

दहा वर्षे सेवा पुर्ण झालेल्या आरोग्य कर्मचार्यांना नियमित शासन सेवेत समायोजन करावे,बदली धोरण,वेतनवाढ,आरोग्य व अपघात विमा आदी मागण्यांसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी,कर्मचारी एकत्रिकरण समितीच्या वतीने दि.१९ ऑगस्ट पासुन सुरु असलेले कामबंद व परळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयापुढे ठिय्या आंदोलन दि.२१ ऑगस्ट रोजी तिसर्या दिवशीही सुरुच आहे.या आंदोलनात परळी तालुक्यातील ८६ कर्मचारी सहभागी झाले आहेत.यामुळे परळी हा वर्षे पूर्ण झालेल्या



कर्मचार्यांचे १०० टक्के समायोजन व प्रत्येक वर्षी ३० टक्के याप्रमाणे सा.आरोग्य विभाग,ग्राम विकास,नगर विकास,वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागात समावेश करावा आदी मागण्यांसाठी परळी तालुक्यातील ८६ आरोग्य कर्मचार्यांनी मंगळवार दि. १९ ऑगस्ट पासुन बेमुदत कामबंद आंदोलन सुरु केले आहे.कर्मचार्यांच्या कामबंद आंदोलनामुळे परळी तालुक्यातील आरोग्य उपकेंद्र,प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत असलेल्या नियमित लसीकरण, तपासणी, औषधोपचार आदी आरोग्य सेवा विस्कळित झाल्या आहेत. या कामबंद आंदोलनात विष्णू मुंडे, सुप्रिया घुंडरे, अंजली वाळले, सुप्रिया तिडके, विजयमाला टाक,अर्चना घुंडरे, जे.पी.घाडगे, ए.डी.चित्तापुरे, अश्विनी मुंडे, समिती लटपटे, सिमीती जाधव, एस.व्ही.बोरवड, एम.एच.नेमाडे,गोविंद लोखंडे, उमेश शिरोळे, शुभम पोतदार, मगन वसावे, गोविंद पौळ, मिलिंद सोनकांबळे, आनंद टेकाळे,सुमंत पवार, आशिष वाघमारे,सागर जाधव, शिवाजी वैद्य, संतोष गायकवाड आदी ८६ आरोग्य कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# अभिलाषा अनिल राजेंद्र जहागीरदार यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**



बीड शहरातील धोंडीपुरा येथील मुळ रहीवाशी अभिलाषा अनिल राजेंद्र - जहागीरदार वय ५२ यांचे मंगळवारी रात्री १२:३० वाजता संभाजीनगर येथील खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असतांना हृदय विकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर बुधवारी सकाळी ११ वाजता शहरातील मोंढा रोडवरील अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात सासु, पती, दोन मुले, सुना ,नात असा परिवार आहे. बीड शहरातील धोंडीपूरा येथील परिमल प्रिंट्सचे मालक अनिल राजेंद्र यांच्या त्या पत्नी होतं

# अक्षय जाधव यांचे नीट पीजी मध्ये घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२० ऑगस्ट**

केज येथील भूमिपुत्र अक्षय अविनाश जाधव यांनी नीट पीजी करिता ऑल इंडिया रँक १५६९ क्रमांक मिळवला आहे. संभाजीनगर घाटी इथे शिक्षण घेताना ही रँक मिळवली आहे.



पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी ही गुणवत्ता महत्त्वाची ठरणार आहे. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल खा रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य दादा पाटील,प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेख नजीर अहमद यांची मराठवाडा अध्यक्षपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२० ऑगस्ट**

ऑल इंडिया उलमा बोर्ड दिल्लीच्या शिक्षण विभागाने मराठवाडा अध्यक्षपदी शेख नजीर अहमद यांची नियुक्ती केली आहे.



शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे ही नियुक्ती विशेष महत्त्वाची मानली जात आहे. या नियुक्तीमुळे संपूर्ण मराठवाड्यात आनंदाची लाट पसरली असून, शिक्षण क्षेत्रात नव्या प्रगतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# न.प.निवडणूक २०२५ प्रभाग निहाय प्रारूप भौगोलिक सिमा प्रसिद्ध

## एकूण १५ प्रभाग ; ३१ न.प.सदस्य, दोन सदस्यीय प्रभागाची संख्या- १४, तीन सदस्यीय प्रभागाची संख्या- ०१, एकूण प्रभागाची संख्या-१५

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२० ऑगस्ट**

न.प.कार्यालयाकडून प्रभाग निहाय हद्द ची यादी जाहीर करण्यात आली आहे.त्यात १५ प्रभागाची रचना करण्यात आली आहे.

यात अनुक्रमे ०१.योगेश्वरी,०२.रविवार पेठ, ०३.जिरे गल्ली,०४.खडकपूरा,०५.परळी वेस,०६.आदर्श कॉलनी,०७.मंगळवार पेठ, ०८.प्रशांत नगर,०९.हौसिंग सोसायटी, १०.गुरुवार पेठ, ११. गवळी पूरा, १२.सदर बझार, १३.एस.आर.टी.दवाखाना, १४.लाल नगर, १५.मोंढा माऊली नगर या प्रमाणे प्रभागांना नावे देण्यात आले आहेत.

आगामी काळात न.प.२०२५ सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत.या पाश्र्वभूमीवर न.प.कार्यालयच्या वतीने प्रारूप भौगोलिक सिमा प्रसिद्ध करण्यात आली आहे.यामध्ये संबंधित मतदांराकडून सुचना व हरकती मागवण्यात आल्या आहेत.हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी १८ ऑगस्ट २०२५ ते ३१ ऑगस्ट २०२५ (दुपारी ३ वाजेपर्यंत) न.प.मुख्याधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात याव्यात अशी माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे.१५ प्रभागात एकूण ३१ न.प.सदस्य संख्याबळ असेल. यामध्ये प्रत्येकी एका प्रभागातून २ न.प.सदस्य(नगर सेवक) निवडून द्यायचे आहेत.१४ प्रभागातून २८ तर १ प्रभागातून ३ सदस्य या प्रमाणे ३१ सदस्यांची संख्या राहील. प्रभाग क्रमांक १५ (मोंढा माऊली नगर) हा सर्वाधिक मतदार संख्याबळ असल्याने येथे ३ सदस्यांची निवड प्रक्रिया राहणार आहे.

# हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ ऑगस्ट**

पोलीस ठाणे श्रीगोंदा,जि. अहिल्यानगर गुरन- २८७/२०२४ कलम ३६३ भादवी प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी कविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल ता. आष्टी,जि. दि. १४/०३/२०२४ रोजीचे २१.०० ते दि.१५.०३.२०२४ रोजीचे पाहटे ३.०० वाजेच्या दरम्यान श्रीगोंदा कारखाना ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथून अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरिता पळवून नेले आहे. सदर मुलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.नाव सविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल,ता. आष्टी, जि. बीड रंग गोरा,उंची सव्वा पाच फुट, गुलाबी रंगाचा व त्यावर फुले फुले असलेला पंजाबी ड्रेस, पायात काळया रंगाचे सॅडल, उजव्या बाजुच्या गालावर खड्डा.वरील वर्णनाच्या मुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास पोलीस ठाणे श्रीगोंदा, पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन श्रीगोंदाचे पोलीस उपनिरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा, असे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर एच खिदळाकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. कोणास सदर मुलगी दिसल्यास कृपया त्वरित मो.क्र.९८८१७३१७२१ यावर संपर्क साधावा:

# नुकसानीचे पंचनामे आणि उपाययोजना करा-आ.संदिप क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

मागील काही दिवसांपासून संपूर्ण बीड जिल्ह्यात अखंडित पाऊस पडत आहे. झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील पिकांबरोबरच पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे पूल वाहून गेले आहेत. या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासोबत बैठक घेऊन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली.





गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राज्यभरात संततधार पाऊस सुरू आहे. बीड जिल्ह्यातही मागील काही दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. अतिवृष्टीमुळे बीड मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोबत पशुधनाचेही नूकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी गावांना जोडणारे अनेक पूल वाहून गेले आहेत. याबाबत प्रशासकीय स्तरावरून उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच शेतकरी बांधवांच्या झालेल्या नुकसानींचे तातडीने पंचनामे करावेत अशी मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.शनिवारी (दि.१९) रोजी बीड नगर परिषदेचे कर्मचारी शेख बाबू यांचा अपघाती मृत्यू झाला होता. बीड शहरातील तेलगाव रोडवर जलजीवन पाणीपुरवठा योजना आणि रस्त्याचे काम सुरू आहे.

### टीसी हरवला आहे

नामे पठाण आयेशा आसेफखान १२ वी (विज्ञान) पासचा टी.सी. माजलगाव येथील अशोक नगर ते बस स्थानक दरम्यान हरवला आहे. कृपया सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
७३८७३४३४५८

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांचे सरसकट तात्काळ पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपयांची मदत द्यावी-डक

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२१ ऑगस्ट**

गेल्या तीन-चार दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे केवळ शेतीच नव्हे तर रस्ते, नदी-नाल्यालगतची जमीनही मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी केली आहे.



१३ ऑगस्टपासून सलग पडणाऱ्या पावसामुळे तालुक्यासह जिल्ह्यातील १७ महसुलमंडळात अतिवृष्टी झाली. परिणामी शेतकऱ्यांच्या हातात आलेले सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी ही पिके पाण्याखाली गेली असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. नदी-नाल्यालगत असणाऱ्या शेतजमिनी खरडून गेल्या आहेत.

याशिवाय गावांना शहराशी जोडणारे रस्ते तसेच शेतात जाणारे पायवाटेचे रस्ते वाहून गेल्याने शेतकऱ्यांचे हाल झाले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने या रस्त्यांची दुरुस्ती करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, तसेच अतिवृष्टीग्रस्त सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी अशी मागणी अशोक डक यांनी केली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# घाणेवाडी तलावाच्या पूर्णतः क्षतीग्रस्त सांडव्याची तातडीने दुरुस्ती करावी - डॉ. संजय लाखेपाटील

## जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्याकडे केली मागणी



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना (प्रतिनिधी) : जालना शहराला शाश्वत पाणीपुरवठा करणाऱ्या संत गाडगेबाबा घाणेवाडी तलावाच्या पूर्णतः क्षतीग्रस्त सांडव्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी मराठवाडा अनुशेष निर्मूलन व विकास मंचाचे अध्यक्ष व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे माजी तज्ञ सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्याकडे केली आहे.

डॉ. लाखेपाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दशकांपासून नॅचरल ग्रॅव्हिटीच्या माध्यमातून (विद्युत खर्चाविना) जालना शहराला तहान भागवणारा हा तलाव गेल्या काही वर्षांत सतत दुर्लक्षित राहिला आहे. गोदावरी–पैठण–अंबड–जालना या महागड्या वीजेवर चालणाऱ्या पाणीपुरवठा योजनेनंतर या तलावाकडे प्रशासनाने डोळेझाक केली. परिणामी तलाव गाळाने भरला आहे, अतिक्रमण वाढले आहे आणि सर्वात गंभीर बाब म्हणजे तलावाचा सांडवा पूर्णतः जिर्णावस्थेत असून फुटण्याच्या धोकादायक स्थितीत पोहोचला आहे.

गेल्या आठवडाभरात या संदर्भातील बातम्या विविध माध्यमांतून ठळकपणे प्रसिद्ध झाल्या आहेत. तरीसुद्धा नगरपरिषद व जलसंपदा विभाग यांच्यातील मालकी हक्क वादामुळे आवश्यक दुरुस्ती व देखभाल कामे रखडली आहेत. वर्षानुवर्षे या जबाबदारीची 'फुटबॉल' खेळली जात आहे.

सद्यस्थितीत, या कामासाठी आपत्ती व्यवस्थापन खात्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार नुकतीच जिल्हा नियोजन समिती च्या एकुण निधी पैकी ५% निधी आपत्कालीन कामांसाठी वापरण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना दिला आहे. या अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी यांनी तातडीने सांडव्याच्या दुरुस्तीला निधी मंजूर करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

डॉ. लाखेपाटील पुढे म्हणाले की, घाणेवाडी तलाव हा जालना शहराच्या अस्तित्वाशी निगडित आहे. पावसाळ्याच्या काळात सांडवा फुटल्यास प्रचंड आपत्ती निर्माण होऊ शकते. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ निर्णय घेऊन सांडव्याची दुरुस्ती करावी तसेच गाळ काढणे, अतिक्रमण हटविणे आणि साठवण क्षमता वाढविण्याची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत.

या निवेदनामुळे जिल्हा प्रशासनाची जबाबदारी वाढली असून, जालना शहरवासीय आता जिल्हाधिकाऱ्यांकडून तातडीची सकारात्मक कारवाई होण्याची अपेक्षा करत आहेत.

# नागरिकांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत नोंदणी करावी - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते योजनेअंतर्गत २ लाख रुपयांच्या धनादेशाचे वितरण




तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणाऱ्या जिल्ह्यातील नागरिकांना नियमितपणे केवळ ४३६ रुपये वार्षिक हप्ता भरुन प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ घेता येतो. या योजनेसाठी उत्पन्नाची कोणतीही अट नाही. शेतकरी, व्यावसायिक, कामगार, नोकरदार आदि या योजनेत सहभागी होवू शकतात. तरी जिल्ह्यातील १८ ते ५० वयोगटातील बँकेत खाते असणाऱ्या नागरिकांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी यांच्या कक्षात गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेच्या लाभार्थ्यांस धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजीनगर येथील बँक ऑफ महाराष्ट्रचे उपप्रादेशिक अधिकारी मुकूंद कांबळे, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी मंगेश केदार, व्यवस्थापक हितेश दामोर, आकाश पाटी, कैलास तावडे यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्ह्यातील प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या कुंभार पिंपळगाव येथील शाखेतील खातेदार असलेले स्व. संतोष कंतुले यांच्या वारसदार श्रीमती रत्नमाला संतोष कंतुले यांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते २ लाख रुपयांचा धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी संबंधित यंत्रणेचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणाऱ्या तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेचा वार्षिक हप्ता केवळ ४३६ रुपये भरलेल्या खातेधारकाचा कोणत्याही कारणामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसदारास २ लाख रुपयांची रक्कम शासनाकडून प्रदान करण्यात येत असते. जिल्ह्यात प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेतंतर्गत पात्र बचत खातेधारकांची संख्या १३ लाख ६७ हजार अशी आहे. जालना जिल्ह्यात प्रधानमंत्री जनधन योजना खातेधारक पात्र संख्या ४ लाख ७० हजार लाख अशी असून आजअखेर प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेतंर्गत २२४ लाभार्थ्यांना प्रत्येकी २ लाख रुपयांप्रमाणे दावे वितरित करण्यात आले आहेत. तर प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेतंर्गत ६४ लाभार्थ्यांना दावा रक्कम वितरीत करण्यात आली आहे. तसेच, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेत वार्षिक फक्त २० रुपये वार्षिक हप्ता भरून अपघाती मृत्यू अथवा अपंगत्वाच्या प्रकरणात १ ते २ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळते. अशी माहिती यावेळी देण्यात आली. तसेच अटल पेंशन योजनेअंतर्गत सर्वोकृष्ट जिल्हा पुरस्कार जालना जिल्ह्याला मिळाला आहे. त्याचे प्रमाणपत्रही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना यावेळी प्रदान करण्यात आले.

# संक्षिप्त

## आम आदमी पार्टीचे भोकरदन येथील गट शिक्षण कार्यालयामध्ये ''झोपा काढा ''आंदोलन; गटविकास अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने आंदोलन मागे



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनीधी

भोकरदन येथील गट शिक्षण अधिकारी कार्यालयाच्या वरंड्यात आम आदमी पार्टीच्या वतीने ता.२१ गुरुवार रोजी शाळेच्या बाबतीत विविध मागण्यासह झोपा काढा आंदोलन सुरू केले होते, आम आदमी पार्टीच्या वतीने गेल्या महिनाभरातभोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट दरम्यान सर्वे करण्यात आला होता , भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषद शाळां काही ठिकाणी पडायला आल्या असून तर काही ठिकाणी शिक्षकांच्या जागा रिक्त आहे या अनुषंगाने गट शिक्षण कार्यालयाच्या वरंड्यात झोपा काढा आंदोलन सुरू केले होते, यावेळी गटशिक्षणाधिकारी आणि पंचायत समितीचे गट विकास अधिकारी महेंद्र साबळे यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन चर्चा केली आणि आमच्या अधिकारातील कामे आम्ही पूर्ण करतो बाकी आमच्या अधिकारा बाहेरील जे आहेत त्या बाबी आम्ही वरिष्ठाकडे कळवले असून आंदोलन मागे घेण्याची विनंती करतो. त्यानुसार आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांसोबत चर्चा झाली आणि वरिष्ठाकडे केलेल्या मागण्या मंजुर करून घेण्यात याव्यात पाठ पुरावा करुन शाळांच्या समस्या सोडवा अन्यथा आम आदमी पार्टी मार्फत पुन्हा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. आंदोलनामध्ये जनार्दन पा. सोळंके, महजाद खान, बोरसे गुरुजी, इब्राहिम कुरेशी, फारुक भाई, धनराज भारती, बाबर भाई, फिरोज भाई, संतोष बोरसे, संतोष साळवे, सलमान खान, माणिकराव दळवी, राज्यात चौधरी, नांजा शिराज शहा, जुनेकादरी, इब्राहिम कुरेशी, रामदास बिरसोणे, आव्हानाव पार्टिचे कार्यकर्ते सहभाग होता.

## शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील लोणी ते गंगा सावंगी टोल नाका तात्काळ बंद करा – प्रकाश सोळंके



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ वरील लोणी–गंगा सावंगी दरम्यान रस्त्याचे ४० टक्के काम अपूर्ण, रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य, धोकादायक प्रवास तरीदेखील येथे टोल वसुली सुरू आहे. हा वाहनचालक व नागरिकांवरील उघड अन्याय असून, हा टोलनाका तात्काळ बंद करण्यात यावा, अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली. सोळंके यांनी म्हटले आहे की, मेघा इंजिनिअरिंग कंपनीने निकृष्ट काम केले असून अधिकाऱ्यांनी डोळेझाक केली. अवैध खनिज उत्खनन प्रकरणात महसूल विभागाने कोट्यवधींचा दंड ठोठावला होता; पण तोही माफ करण्यात आला. रस्त्याला भेगा, खोल खड्डे, अपूर्ण पूल यामुळे जनतेचे हाल होत आहेत. श्रिष्टी नदीवरील अपूर्ण पुलामुळे मागच्या आठवड्यात राष्ट्रीय महामार्ग तब्बल २४ तास बंद होता. तसेच बीड जिल्ह्यातील केज ते धारूर येथे या राष्ट्रीय महामार्गावर टोल नाका उभारला होता परंतु जनतेने आंदोलन करून तो बंद पाडला आहे, कारण केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनीसुद्धा रस्ता दर्जेदार आणि पूर्ण नसताना टोल आकारणी चुकीची असे स्पष्ट केले होते. तरीदेखील शासन व विभागीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष सुरू असल्याचा आरोप मनसेने केला आहे. मनसेने इशारा दिला आहे की, लोणी ते गंगा सावंगी टोलनाका तात्काळ बंद झाला नाही, तर पक्ष कार्यकर्ते स्वतः आंदोलन करून टोल बंद करतील. दोषींवर कठोर कारवाई व दंड आकारावा, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# बदनापूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान



तभा वृत्तसेवा
बदनापूर/प्रतिनीधी

बदनापूर तालुक्यातील अंबडगाव, धोपटेश्वर, गेवराई बाजार व गोकुळवाडी परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. ही माहिती मिळताच बदनापूरचे तहसीलदार हेमंत तायडे यांच्याशी संपर्क साधून स्थानिक पदाधिकारी व अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेतली.

अंबडगाव, धोपटेश्वर, गेवराई बाजार व गोकुळवाडी शिवारात पाहणीदरम्यान शेतकरी शुभम प्रभाकर कान्हेरे, दिनेश नारायण कान्हेरे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले. सोयाबीन, मूग, उडीद, कापूस यांसारखी हंगामी पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. या पाहणीवेळी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची माहिती घेऊन प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याचे, शेतकऱ्यांना शासकीय मदत व अनुदान देण्याचे तसेच नुकसान भरपाई त्वरीत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले गेले. या वेळी बदनापूर तहसीलदार हेमंत तायडे, तालुका कृषी अधिकारी गोपाल गुजर, पंचायत समिती गटविकास अधिकारी सौ. ज्योती राठोड, मंडळ अधिकारी भारडीकर, माजी जिल्हाध्यक्ष भाजप बद्रीनाथ पठाडे पाटील, बदनापूर विधानसभा प्रमुख अनिलराव कोलते पाटील, तालुकाध्यक्ष भगवान मात्रे पाटील, तलाठी चव्हाण, सरपंच सुरेश लहाने यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

# जनविकास शिक्षण संस्थेसह तालुक्यातील सर्व शाळांना क्रीडा साहित्य उपलब्ध करण्यास प्रयत्न करणार – आ विक्रम काळे



तभा वृत्तसेवा
भोकरदन /प्रतिनीधी

भोकरदन येथील जनविकास शिक्षण संस्थेच्या मैदानावरील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद – जालना द्वारे आयोजित तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२५–२६ वयोगट १४, १७, १९ वर्षा आतील मुले/ मुली च्या व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन व दीपप्रज्वलन प्रसंगी मराठवाडा विभाग, शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रतिपादन केले. पुढे ते म्हणाले की, जनविकास शिक्षण संस्था ही भोकरदन तालुक्यातील नामांकित संस्था असून या संस्थेचे विद्यार्थी हे अभ्यासात तर हुशार आहेतच तसेच खेळात ही अग्रेसर असुन संस्थेचे विद्यार्थी राज्य तथा इतरराज्य पातळीवर सुद्धा विविध खेळात सहभागी होऊन नावलौकिक केलेले आहेत. भोकरदन तालुक्यातील जनविकास शिक्षण संस्थेसह सर्व शाळांना क्रीडा साहित्य मिळविण्यासाठी मी शासन स्तरावर प्रत्यन करेल व ते सर्व शाळेला मिळेल याची काळजी घेईन असे ही ते म्हणाले. जनविकास शिक्षण संस्थेच्या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, सचिव अमृतराव देशमुख, कोषाध्यक्ष मंजुषा देशमुख तथा संचालक मंडळ व पालक, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग यांचा सिंहाचा वाटा आहे चा त्यांनी आपल्या भाषणात आवर्जून उल्लेख केला. तालुका क्रीडा समन्वयक तथा मुख्याध्यापक कृष्णा पा. जंजाळ यांच्यासह प्राचार्य/ मुख्याध्यापक, क्रीडाशिक्षक, विद्यार्थी, पालक व ता क्रीडा कार्यालयातील कर्मचारीवर्ग यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक नवगिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सोपान सपकाळ यांनी केले. आ काळेसह मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व्हॉलीबाल स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत भोकरदन तालुक्यातील ३९ शाळेच्या संघाने सहभाग नोंदविला आहे.

# बसस्थानक रस्त्यावर जिल्हाप्रमुख महेश नळगेंच्या पुढाकाराने मुरूम टाकण्यास सुरूवात!

तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

परतूर शहरातील पोलीस स्टेशन ते बसस्थानक आणि पुढे अग्निशमन दलापर्यंतचा मुख्य रस्ता मोठ मोठ्या खड्ड्याने खड्डेमय अवस्थेत असल्याने नागरिकांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. पावसाळ्यात तर या रस्त्यावर मोठमोठी पाण्याची डबकी तयार होऊन वाहतूकदार, रुग्णवाहिका तसेच शालेय वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या गंभीर समस्येची दखल घेत जिल्हाप्रमुख उबाठा महेश नळगे यांनी पुढाकार घेत नागरिकांना दिलासा दिला आहे. त्यांनी स्वतःच्या स्वखर्चाने या रस्त्यावर मुरूम टाकण्याचे काम हाती घेतले. आज सकाळीच या कामाला सुरुवात करण्यात आली असून नागरिकांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमाचे स्वागत केले.

रस्त्याची अवस्था पाहता प्रशासनाकडून योग्य ती दुरुस्ती होण्याची अपेक्षा होती; मात्र अनेक वर्षांपासून हा प्रश्न रखडत असल्याने लोकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. त्यातूनच महेश नळगे यांनी स्वखर्चातून हा रस्ता काही प्रमाणात वापरायोग्य करण्याचा निर्णय घेतला.



परतूर बस्थानाक ते अग्निशमक दल या रस्त्यावर मुरूम टाकण्याचे काम सुरू झाले आहे यामुळे जिल्हाप्रमुख महेश नळगे, परिसरातील नागरिक दिसत आहे.

यावेळी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नळगे यांच्या या उपक्रमामुळे परतूरकरांना मोठा दिलासा मिळाल्याचे नागरिकांनी सांगितले. नेहमी तक्रारींवर चर्चा होते, पण प्रत्यक्षात रस्ता सुधारण्याचे काम केले, यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत, अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त झाल्या.

> मागील अनेक वर्षापासून या रस्त्याची दुरवस्था झाली होती याठिकाणी शाळा असल्याने विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना साधे चालणे देखील कठीण झाले होते.ही बाब लक्षात घेत छोटासा पुढाकार घेत याठिकाणी मुरूम टाकण्याचे काम हाती घेतले आहे.
> **महेश नळगे**
> जिल्हाप्रमुख उबाठा–जालना

# आ. अर्जुनराव खोतकर यांच्या मागणची गांभीर्याने घेतली दखल!!

## अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे जिल्हा प्रशासनाला आदेश



तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांवर संकट ओढावले आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पुराचे पाणी शेतांमध्ये साचल्यामुळे कापूस, तूर, सोयाबीन मका यांसारखी खरीप पिके मोठ्या प्रमाणावर बाधित झाली आहेत. तसेच जिल्ह्यातील मोसंबी फळबागाही धोक्यात आल्या असून फळगळतीमुळे बागायतदारांना मोठा फटका बसला आहे.

याशिवाय अतिवृष्टीमुळे झालेल्या पुरात मनुष्यहानी, पशुधनाची हानी, पिकांचे नुकसान, घरांची पडझड अशा विविध नुकसानीची नोंद झाली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पुराच्या पाण्यामुळे खरडुन जाऊन जमीनीचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तत्काळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे हा विषय मांडला.

त्यांच्या या मागणीची गांभीर्याने दखल घेत पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. तात्काळ सदर बाबींचा अहवाल शासनाला सादर करावा अशा सूचना केल्या आहेत. यामुळे शासनस्तरावर मदत मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच वेळोवेळी अनुपालन अहवाल सादर करावा, अशा सूचना दिल्या आहेत.

शेतकरी बांधवांना वेळेवर मदत मिळावी, त्यांच्या समस्या सोडवाव्यात यासाठी प्रयत्नशील राहणाऱ्या आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांच्या पुढाकारामुळे शासन स्तरावर त्वरीत निर्णय घेण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात झालेल्या सकारात्मक भूमिकेबद्दल आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे मनःपूर्वक आभार मानले. यामुळे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी देखील एकप्रकारे दिलासा दायक बाब आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत द्या : देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** गेल्या पाच दिवसांत झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे मराठवाड्यासह राज्यभरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे तातडीने पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना भरीव आर्थिक मदत देऊन त्यांना या अडचणीच्या काळात धीर द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते माजी आमदार धीरज देशमुख यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

धीरज देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना पत्र देऊन राज्यातील आणि लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीकडे लक्ष वेधले.

मागील पाच ते सहा दिवसांत झालेल्या पावसामुळे राज्यात १४ लाख एकरांवरील पिकांचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मराठवाड्यातही पिकांच्या नुकसानीचा आकडा मोठा आहे. येथे तब्बल ३ लाख ५८ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. पिकांना फटका बसण्याबरोबरच अतिवृष्टी व पुरामुळे मराठवाड्यातील अनेक जनावरे वाहून गेली आहेत. आतापर्यंत ४९८ जनावरे दगावल्याची माहिती आहे.

अतिवृष्टीमुळे गेल्या काही दिवसांत मराठवाड्यातील १३ शेतकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेक घरांची पडझड झाली आहे. त्यामुळे ५८८ जणांचा संसार उघड्यावर आला आहे. मराठवाड्यासह राज्यात झालेल्या या नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना, ग्रामस्थांना आणि मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारने तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रवक्ते माजी आमदार धीरज देशमुख यांनी पत्राद्वारे केली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### लातूर अर्बन बँकेची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** येथील लातूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची ३०वी वार्षिक सर्वसाधारण सभा उद्योग भवन येथील बँकेच्या मुख्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

यात सहकार प्रशिक्षण केंद्राचे उपप्राचार्य एस. आर. कोळे व जिल्हा सहकार बोर्डाचे विकास अधिकारी एस. बी. येळीकर यांची मूलतत्वे स्पष्ट केली. बँकेचे कार्यकारी संचालक नवनीत भंडारी यांनी गत सभेचे इतिवृत्त वाचले. चेअरमन आकाश राठी यांनी बँकेने डिजिटलायझेशनचा वापर सुरू केला आहे. त्याचा ग्राहकांपर्यंत लाभ पोहोचविण्याचे आवाहन केले. सभासदांना ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. बँकेचे संस्थापक चेअरमन तथा मार्गदर्शक प्रदीप राठी यांनी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त आदरांजली वाहिली.

### प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना सद्भावना पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** लातूर येथील प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना अंबाजोगाई येथील भ. की. सबनीस राज्यस्तरीय सद्भावना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल बुधवारी सत्कार करण्यात आला.

पांडुरंग देडे, प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड, शिवाजी कांबळे, प्रा. कल्याण कांबळे, ज्येष्ठ संपादक अशोक चिंचोले आदींनी प्राचार्य नागोराव कुंभार यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी प्राचार्य कुंभार यांनी संपादक अशोक चिंचोले यांचा त्यांच्या ध्येयवादी पत्रकारितेबद्दल सत्कार केला. याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना प्राचार्य कुंभार म्हणाले, हा पुरस्कार केवळ माझा सन्मान नसून, माझ्या सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांचा आणि सहकाऱ्यांचा सन्मान आहे.मी नेहमीच लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवला आहे असे ते यावेळी म्हणाले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

### 'अभाविप'ची महानगर कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगरच्या नेतृत्वाची घोषणा करण्यात आली असून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अध्यक्षपदी प्रा. डॉ. प्रसाद कदम यांची फेरनिवड तर महामंत्री म्हणून निशिगंधा बेंबळे यांची निवड करण्यात आली आहे.

'युवा गर्जना' या विद्यार्थी संमेलनात निर्वाचन अधिकारी जितेंद्र जोशी यांनी या निवडीची अधिकृत घोषणा केली. जाहीरनाम्यानुसार या जबाबदाऱ्यांचा कार्यकाळ एक वर्षाचा राहणार आहे. यावेळी उर्वरित लातूर महानगर कार्यकारिणीचीही घोषणा करण्यात आली. या प्रसंगी अभाविपचे प्रदेश संघटन मंत्री सिद्धेश्वर लटपटे उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांची पूरग्रस्त गावांना भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी उदगीर तालुक्यातील पूरग्रस्त मौजे बोरगाव बुद्रुक, धडकनाळ आणि टाकळी या गावांना भेट देऊन पूरग्रस्त भागातील शेती, घरांचे नुकसान आणि इतर बाधित क्षेत्रांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रशासनाची बैठक घेऊन पंचनामे, उपाययोजना आणि नागरिकांच्या आरोग्य सुविधांबाबत आढावा घेतला.

जिल्हाधिकाऱ्यांनी बोरगाव येथील तानाजी धोंडीबा सुभाने, हनुमंत अर्जुन सुभाने आणि रमेश अर्जुन सुभाने यांच्या घरांना भेट देऊन पाहणी केली, जिथे तीन ते चार फूट पाणी साचले होते. त्यांनी गावकऱ्यांना प्रशासनाच्या सर्व उपाययोजनांची माहिती देऊन आश्वस्त केले. पीक नुकसानी, मृत जनावरे, पडझड झालेली घरे आणि इतर नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून पात्र लाभार्थ्यांना सानुग्रह अनुदान त्वरित वितरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. बोरगाव आणि धडकनाळ गावातील विद्युत पुरवठा आजच सुरळीत करण्याच्या सूचना देतानाच, गावात अस्वच्छतेमुळे रोगराई पसरणार नाही यासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

## गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद शांततेत साजरे करून सामाजिक एकोपा जपूया




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** आपल्या जिल्ह्याची शांतताप्रिय जिल्हा अशी ओळख आहे. सर्वधर्मीय सण, उत्सव आतापर्यंत उत्साहाने व सामाजिक सलोखा जपत साजरे झाले आहेत. हीच वैभवशाली परंपरा कायम ठेवत यंदाचा पोळा, गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद शांततामय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी केले.

दयानंद सभागृहात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. या बैठकीस पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, महापालिका आयुक्त मानसी मीना, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे यांच्यासह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि मुस्लीम बांधव उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी ठाकूर म्हणाल्या, गणेशोत्सवात ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी आदी विषयांवर देखावे सादर करावेत. नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश द्यावा. सर्वधर्मीयांनी एकत्र येऊन सामाजिक विश्वास दृढ करावा. गतवर्षी लातूरच्या गणेशोत्सव मंडळाला राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. यंदा प्रथम क्रमांक मिळवण्यासाठी सामाजिक संदेश देणारे उत्कृष्ट देखावे सादर करावेत. डॉल्बीमुक्त गणेशोत्सवासाठी सहकार्य करण्याचे आणि पारंपारिक वाद्यांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद साजरे करताना सर्वांनी नियमांचे काटेकोर पालन करावे आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरे करावेत, असेही त्या म्हणाल्या.

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांचे आवाहन

जिल्ह्यातील वृक्ष लागवड चळवळीला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी सुरु केलेल्या 'माझं लातूर, हरित लातूर' उपक्रमाच्या धर्तीवर पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी 'माझं लातूर, सुरक्षित लातूर' हा उपक्रम जाहीर केला. प्रत्येक गणेशोत्सव मंडळाने आपल्या मंडपात किमान चार सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, असे आवाहन त्यांनी केले. डॉल्बी लावण्यास परवानगी नसून, मर्यादा ओलांडल्यास कठोर कारवाई होईल, असे पोलीस अधीक्षक तांबे यांनी स्पष्ट केले.

मुस्लीम बांधवांनी ईदची मिरवणूक गणेशोत्सवानंतर काढण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. बैठकीत गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि मुस्लीम बांधवांनी सूचना मांडल्या. उदगीरचे उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शहरातील जीर्ण इमारतींवर हातोडा कधी?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** शहराची मुख्य व्यापारपेठ असलेल्या गंजगोलाईला ११० वर्षे पूर्ण होत आहेत. गोलाईत तेव्हा बांधलेल्या अनेक इमारती आजही उभ्या आहेत. यातील २६ इमारती जीर्ण झाल्या आहेत. त्यापैकी केवळ ९ इमारती पाडण्यात आल्या आहेत. अद्यापही १७ धोकादायक इमारती उभ्या आहेत. त्या पाडण्यासाठी महापालिका केवळ नोटिसांचे कागदी घोडे नाचविण्यात व्यस्त आहे. पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी व संततधार पावसामुळे या इमारती कोसळून जीवितहानी होण्याची भीती आहे. महापालिका अशा जीर्ण इमारती कधी पाडणार की, दुर्घटना घडण्याची वाट पाहणार, हा सवाल आहे.

शहरासह जिल्ह्यातील नागरिक खरेदीसाठी गोलाईलाच प्राधान्य देतात. या गोलाईची स्थापना झाली त्या काळात येथे व्यावसायिक इमारती बांधण्यात आल्या आहेत. त्या इमारती आता जीर्ण झाल्या आहेत. मागील वर्षभरापूर्वी जीर्ण इमारती पाडण्यासाठी इमारत मालकांना भाग पाडले जात होते. परंतु, सध्या या इमारतींकडे महापालिका जाणीवपूर्वक कानाडोळा करीत असल्याचे दिसून येत आहे. महापालिकेचे हे अक्षम्य दुर्लक्ष नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे. मागील चार महिन्यांपूर्वी गोलाईच्या बाजूला असलेल्या घंटे लॉजच्या इमारतीचा कडा कोसळला होता. त्याखाली दबल्याने एका रिक्षासह दोन मोटारसायकलींचे प्रचंड नुकसान झाले होते. सुदैवाने सकाळच्यावेळी त्या इमारतीखालच्या रस्त्यावर कोणीही व्यक्ती नव्हता. अन्यथा त्याच्याही जीवाला धोका होण्याची शक्यता होती. घटनेचे गांभीर्य पाहून महापालिकेने सदर इमारत पाडण्यासाठी नोटीस दिली होती. इमारत मालकाने केवळ गॅलरीचे छत काढल्यासारखे करून काम बंद केले आहे.



आजही या इमारतीत दिमाखाने सुमारे १३ भाडेकरू व्यावसायिक दुकाने थाटून बसले आहेत. त्यांच्याकडे कामगार काम करतात. खरेदीसाठी दररोज हजारो नागरिक या इमारतीत येतात. मागील पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी व संततधार पावसामुळे जुन्या इमारतींमध्ये पाणी जात आहे. त्या पडण्याची भीती आहे. हे नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे. परंतु, महापालिका प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवून नोटिसा देण्यात व्यस्त आहे. एखादी दुर्घटना घडून कुणाचा तरी जीव गेल्यावर महापालिकेला जाग येणार आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

## पावसाळ्यात प्रकृती सांभाळण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून गेल्या काही दिवसात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे वातावरणात अचानक बदल होऊन आर्द्रता वाढली आहे. परिणामी वातावरणातील प्रदूषणही वाढले असून ओलसरणामुळे घर बुरशीजन्य (फंगल इन्फेक्शन) होण्याची दाट शक्यता आहे.

बुरशीच्या प्रादुर्भावामुळे मानवी जीवनात खोकला, ताप व दमा यासारखे आजार बळवण्याची शक्यता लक्षात घेऊन तशी लक्षणे आढळून आल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला व उपचार घेण्याची गरज श्वसन विकार तज्ञ डॉ. रमेश भराटे यांनी वर्तवली आहे.

ज्या रुग्णांना दमा, श्वसन विकार, मधूमेह, किडनी विकार असे आजार आहेत त्याना फंगल इन्फेक्शन व वायरल आजार होण्याची दाट शक्यता निर्माण होते. परंतु, अशी लक्षणे आता सर्वसामान्य रुग्णांमध्येही आढळून येत असून ही बाब गंभीर आहे. जर घरात ओलसरपणा असेल किंवा बुरशी असेल तर त्वरित दूर करून अशा प्रदूषणापासून मुक्त राहणे गरजेचे आहे. या काळात साधारणपणे कोरडा खोकला, घसा खवखवणे, डोके दुखणे, सर्दी होणे, नाक गळणे, अंग दुखणे, दम लागणे, ताप येणे ही लक्षणे दिसून येतात असे ते म्हणाले.

## आंतरमहाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत लातूर कृषि महाविद्यालयाचा संघ उपविजेता



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, लातूर मुलांचा संघ दि. १८ ते १९ ऑगस्ट दरम्यान पार पडलेल्या आंतरमहाविद्यालयीन विद्यापीठस्तरीय स्पर्धेत उपविजेता ठरला. कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी बॅडमिंटन संघातील खेळाडू विलास वरकड, हरीष राठोड, रामेश्वर अनंतवार, अंकित कुमार व आदित्य स्वामी यांचे व त्यांच्या संघ मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

उत्कृष्ट खेळाच्या प्रदर्शनामुळे विलास वरकड या विद्यार्थ्याची विद्यापीठ संघात निवड करण्यात आली. हा विद्यार्थी आंतरविद्यापीठीय अश्वमेध स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करेल. याप्रसंगी कृषि महाविद्यालय, जिरेवाडीचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.दिनेशसिंह चौहान, पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकूरचे अधिष्ठाता डॉ.संतोष कांबळे, डॉ.व्यंकट जगताप, जिमखाना उपाध्यक्षा डॉ.ज्योती देशमुख, डॉ. राजेश शेळके, संघ व्यवस्थापक डॉ.दयानंद मोरे, डॉ.अजित पुरी आणि डॉ.वैभव कांबळे उपस्थित होते. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरु प्रा. (डॉ.) इंद्र मणि, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ.भगवान आसेवार व कुलसचिव संतोष वेणीकर यांनी खेळाडूंच्या यशाबद्दल अभिनंदन केले.

## राष्ट्रीय आरोग्य अभियानचे ७७८ कर्मचारी बेमुदत संपावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) ७७८ कर्मचारी मंगळवारपासून (दि. १९) बेमुदत संपावर असून जिल्ह्यातल्या आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण आला आहे. नियमित समायोजनासह अन्य मागण्यांसाठी एनएचएम कर्मचारी संपावर आहेत.



१४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत समायोजन करण्यासाठी शासनाने निर्णय घेतलेला नाही. राज्य विधीमंडळाच्या (२०२५) पहिल्या अधिवेशनात चर्चा झाली. नियमित करण्याचा निर्णय घेतला. १५ टक्के मानधनवाढ, लॉयल्टी बोनस लागू करावा. १० वर्ष पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना कायम करण्यात यावे. एनएचएम अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युटी द्यावी. ज्या कर्मचाऱ्यांचे मानधन १५५०० रूपयांपेक्षा अधिक आहे, अशा कर्मचाऱ्यांना ईपीएफची योजना लागू करावी. २०१६-१७ पूर्वीपासून कार्यरत कर्मचारी, अधिकाऱ्यांचे वेतन सुसूत्रीकरण करून २०१६-१७ पूर्वी कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनात २५ टक्के वाढ करावी, यासह अन्य मागण्यांसाठी एनएचएम कर्मचारी मंगळवारपासून बेमुदत संपावर गेले असून, त्यांनी जिल्हा परिषद परिसरात ३५० एनएचएम कर्मचारी तर उर्वरित कर्मचाऱ्यांनी तालुक्याच्या ठिकाणी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा आरोग्य यंत्रणेवर मोठा ताण आला असून, सरकारने तात्काळ निर्णय घेऊन येऊ घातलेल्या दिवाळी सणाच्या तोंडावर एनएचएम कर्मचाऱ्यांना भेट द्यावी, अशी मागणी होत आहे.

## रस्त्यावर उतरल्याशिवाय कोणतीही क्रांती होत नसते

### 'अंनिस'चे जिल्हाध्यक्ष डॉ. रोडे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** जगातील सर्वच क्रांती सामान्य माणूस रस्त्यावर उतरल्यामुळे घडून आल्या. त्यामुळे रस्त्यावर उतरल्याशिवाय कोणतीही क्रांती होत नसते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी केले.



महाराष्ट्र राज्य अंधश्रध्दा निर्मूलन समिती जिल्हा शाखा, लातूर व शहर शाखा, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर स्मृतिदिनानिमित्त आयोजित निर्भय मॉर्निंग वॉक समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. रोडे म्हणाले, शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी समाजाला निर्भय, विवेकशील बनवण्याचा प्रयत्न केला. पण काही समाजविघातक शक्तींनी त्यांचा निर्घृण खून केला. तरीही डॉ. दाभोळकर यांच्या विचाराने ते आपल्यामध्ये आहेत याची प्रचिती वेळोवेळी येते.

यावेळी 'आम्ही सारे दाभोळकर, 'लढेंगे जितेंगे', 'विवेकाचा आवाज बुलंद करूया' आदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी रामकुमार रायवाडीकर, रुकसाना मुल्ला, अजित निंबाळकर, शरद झरे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. दशरथ भिसे यांनी तर, सूत्रसंचालन जिल्हा प्रधान सचिव सुधीर भोसले यांनी केले. आभार शहर कार्याध्यक्ष डॉ. गणेश गोमारे यांनी मानले.

यावेळी बब्रुवान गोमसाळे, उत्तरेश्वर बिराजदार, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, मंगल बावगे, अनिल दरेकर, ज्योती ढगे, पांडुरंग देडे, ॲड. सुरेश सलगरे, शिवाजी नरहरे, डॉ. बी. आर. पाटील, रमेश चिल्ले, हनुमंत मुंडे, ॲड. सुधाकर अडसुळे, डॉ. अमीर शेख, गंगाधर गवळी, राहुल लोंढे, परमेश्वर बडगिरे, बाळासाहेब जगताप, सुपर्ण जगताप, रणजीत आचार्य, सचिन गायकवाड, नबी शेख यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

## लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव; बैलपोळा उत्सव साध्या पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२१ ऑगस्ट -** जिल्ह्यात सध्या लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर, येत्या २२ ऑगस्ट रोजी साजरा होणारा बैलपोळा उत्सव साध्या आणि सुरक्षित पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना राबवण्यात येत असून, पशुपालकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लातूर जिल्ह्यात लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव गेल्या काही दिवसांपासून वाढत आहे. जिल्हा प्रशासनाच्या सद्यस्थिती अहवालानुसार, विविध तालुक्यांमध्ये एकूण ४११ जनावरे या रोगाने बाधित झाली आहेत. त्यापैकी २०० जनावरे उपचारानंतर पूर्णपणे बरी झाली आहेत, तर १७९ जनावरे अद्याप उपचाराधीन आहेत. दुर्दैवाने, ३२ जनावरांचा या रोगामुळे मृत्यू झाला आहे. हा रोग जनावरांच्या त्वचेवर गाठी निर्माण करतो, ज्यामुळे जनावरांना अशक्तपणा येतो आणि त्यांचे आरोग्य धोक्यात येते. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध कठोर उपाययोजना राबवल्या जात आहेत, ज्यात बाधित क्षेत्रांमध्ये जनावरांची खरेदी-विक्री आणि वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे.

बैलपोळा हा महाराष्ट्रातील शेतकरी व पशुपालकांसाठी महत्त्वाचा उत्सव आहे, जो दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. यंदा हा उत्सव २२ ऑगस्ट रोजी आहे. मात्र, लंपी चर्मरोगाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे गर्दी आणि मिरवणुका टाळण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी दिले आहेत. बैलपोळा उत्सव गर्दी टाळून, मिरवणूक न काढता, स्वतः च्या गोठ्यातच साध्या आणि स्वच्छ पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. यामुळे रोगाचा प्रसार रोखता येईल आणि जनावरांचे संरक्षण होईल. पशुपालाकांनी गोठ्याची काटेकोर स्वच्छता राखावी. शेण आणि लघवी योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी. गोठ्यात ओलसरपणा, चिखल किंवा घाण टाळावी, जेणेकरून रोगाचा प्रसार होणार नाही. गोचीड, गोमाश्या आणि डास यांसारख्या परोपजीवींच्या नियंत्रणासाठी नियमित फवारणी आणि निर्जंतुकीकरण करावे. गोठ्याभोवती साचलेले पाणी त्वरित काढून टाकावे, जेणेकरून डासांची पैदास होणार नाही. बाधित गावांमध्ये आणि ५ किलोमीटर परिघातील क्षेत्रांमध्ये जनावरांची खरेदी-विक्री, वाहतूक, बाजारपेठा आणि जत्रांवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. याचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.बैलांच्या नाकावाटे तेल, अंडी किंवा इतर पदार्थ पाजू नयेत. यामुळे फुफ्फुसाला इजा होऊन निमोनिया होण्याचा धोका वाढतो. बैलांची शिंगे तासून त्यावर रंग किंवा पेंट लावू नयेत. यामुळे संसर्ग होऊन शिंगाचा कॅन्सर होण्याची शक्यता असते. जनावरांना शिजवलेले अन्न, गोड पदार्थ किंवा तेलकट पदार्थ जास्त प्रमाणात खाऊ घालू नयेत. यामुळे पोटफुगी किंवा ॲसिडोसिससारखे आजार उद्भवू शकतात. जनावरांना स्वच्छ पाणी, हिरवा चारा आणि पौष्टिक आहार द्यावा, जेणेकरून त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढेल. एखाद्या जनावरामध्ये गळ्यावर सूज, अंगावर गाठी, अशक्तपणा किंवा पाणी न पिणे अशी लक्षणे दिसल्यास तात्काळ जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे काम अतुलनीय; जिल्हाधिकाऱ्यांनी मानले आभार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ ऑगस्ट**

जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पाऊस व अतिवृष्टी झाल्याने काही गावात पूरस्थिती निर्माण झाली होती. या ठिकाणी मदत व बचाव करण्यासाठी नांदेड येथे मागील दोन महिन्यांपासून तैनात असलेली राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडी जिल्हाप्रशासनाने तातडीने पाठविली. बचाव कार्य पूर्ण झाल्यानंतर आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकडीचे कृतज्ञता व्यक्त करून आभार मानले.



मुखेड तालुक्यातील १७ व १८ ऑगस्ट रोजी मोठ्या प्रमाणावर पाऊस व अनेक मंडळात अतिवृष्टी झाली होती. दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी मंडळात ३५४.७५ मिमी व मुक्रामाबाद मंडळात २०६.७५ मिमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे हसनाळ, रावणगाव, भासवाडी व भिंगोली या गावात पूरस्थिती निर्माण होऊन मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थ अडकून पडले होते.

दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे ०२:३० वाजता हसनाळ व रावणगावमध्ये गावात पावसाचे पाणी घुसले असल्याबाबत ग्रामस्थांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी पूरपरिस्थिती असलेल्या गावांमध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची टीम पाठविली. पहाटे ०३ वाजता राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची टीम नांदेडहून निघून सकाळी पाच वाजता घटनास्थळी पोचली. पहाटे पाच वाजल्यापासूनच या तुकडीने बचाव कार्यास सुरूवात केली. या तुकडीने रावणगाव येथील २७१, हसनाळ येथील ३०, भासवाडी येथील ४० व भिंगोली येथील ४५ असे एकूण ३८६ लोकांना बोटीच्या सहाय्याने सुरक्षित ठिकाणी हलविले. त्यामुळे आणखी मोठी हानी टाळणे शक्य झाले. तसेच या तुकडीला हसनाळमध्ये पुराच्या पाण्यामधून तीन महिलांचे मृतदेह काढण्यात यश आले. या तुकडीमुळे आपत्तीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनास मोठी मदत झाली. आज गुरुवार २१ ऑगस्ट रोजी दुपारी जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी ही तुकडी तैनात असलेल्या जिल्हा क्रीडा संकुल येथे जाऊन तुकडीतील सर्व अधिकारी व जवान यांच्याशी संवाद साधला. तसेच या बचाव कार्यात जखमी झालेल्या ८ जवानांची विचारपूस केली. या प्रसंगी बोलताना अशा प्रकारे जीवावर उदार होऊन कमीत कमी वेळात एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकांचे प्राण वाचविण्याचे अतुलनीय आपल्या तुकडीने केले असून आपल्या कामाचे कौतुक शब्दात व्यक्त करणे शक्य नाही असे उद्गार जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी काढले व केलेल्या कामाबद्दल त्यांनी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकडीचे आभार मानले.

याप्रसंगी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे पोलीस उपनिरीक्षक शंकर उकंडे, पोलीस उपनिरीक्षक सुधीर शिरसाट, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभारे, जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राचे बारकुजी मोरे, कोमल नागरगोजे हे उपस्थित होते.

# किनवट शहरातील पुरग्रस्त भागाचे पंचनामे सुरु

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. २१ ऑगस्ट -**

किनवट नगर परिषद हद्दीत १५ व १६ ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे तसेच इसापुर धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर पुरस्थिती निर्माण झाली होती. या पुरामुळे शेकडो घरामध्ये पाणी शिरले व नागरिकांच्या संसारोपयोगी वस्तूंसह घरगुती साहित्याचे प्रचंड नुकसान झाले. या संकटग्रस्त परिस्थितीची पाहणी करण्यासाठी किनवटचे आमदार भिमराव केराम व जंगो रायताड प्रतिष्ठाणचे अध्यक्ष ॲड. प्रतिक केराम यांनी नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्यासह शहराचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. दौऱ्यानंतर नागरिकांना तात्काळ दिलासा मिळावा या करिता नगर परिषद प्रशासनाने तातडीने मदतकार्य हाती घेतले.

मुख्याधिकारी डॉ. कुरवाडे व कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद प्रशासनाने नागरिकांच्या निवाऱ्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था केली. पुरग्रस्तांना सुरक्षित स्थळी हलविणे, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय करणे तसेच गरजूंना अन्न व निवारा उपलब्ध करून देण्याचे काम



प्रशासनाने युद्धपातळीवर केले.

याच अनुषंगाने डॉ. कुरवाडे यांच्या सूचनेनुसार नागरिकांच्या घरात शिरलेल्या पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करण्यात आले आहेत. याकरिता नगर परिषदेकडून तीन ते चार स्वतंत्र कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या पथकांची नेमणूक करण्यात आली असून, पंचनामे पूर्ण होताच लवकरच नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्यात येणार आहे.

नगर परिषदेने केलेल्या तातडीच्या उपाययोजनांचे व डॉ. अजय कुरवाडे यांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आलेल्या मदत कार्याचे शहरातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी विशेष कौतुक केले आहे. परिस्थिती हाताळण्यात प्रशासनाने दाखविलेली तत्परता व जबाबदारी पाहून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### 'परांजन' निमित्ताने श्री दत्त शिखर संस्थान येथील पुजारी प्रतिनिधींचे पाद्यपूजन

**माहुर** -श्री क्षेत्र माहूरगडावरील श्री रेणुका देवी मंदिर संस्थान कडून



दरवर्षी श्रावण मास समाप्ती निमित्ताने 'परांजन' हा विशेष धार्मिक व पारंपारीक सोहळा आयोजित करण्यात येतो. श्री रेणुकादेवी संस्थान कडून परंजन कार्यक्रमास दत्तशिखर येथील महंत महाराजांना गुरुपूजन करण्यासाठी व भोजन करण्यासाठी रितसर आमंत्रण देण्यात येते. यावर्षीही ह्या धार्मिक परंपरेप्रमाणे महंत महाराजांना मानाचे आमंत्रण देण्यात आले.परंतु, ते येऊ शकत नसल्याने त्यांचे प्रतिनिधी वासुदेव भारती महाराज,हरिअर भारती महाराज, चिरंजीव भारती महाराज ,शिलानंद भारती महाराज ,माधवगिरी संतोष भारती महाराज,सचिन भारती महाराज ,नितेश भारती महाराज यांनी आज श्री रेणुकादेवी मंदिर येथे उपस्थित झाले.त्यांनी दत्त शिखर संस्थांकडून रेणुका मातेला महाआरती केली. श्री रेणुका देवी संस्थान कडून या पुजारी प्रतिनिधींचे पाद्यपूजन करून त्यांना पुरणपोळीचे महामिष्ठान्न जेवू घालण्यात आले. यावेळी संस्थानकडून त्यांचा उचित मानसन्मान करण्यात आला. श्रावण मास समाप्ती निमित्ताने 'परांजन' ही धार्मिक प्रथा कैक वर्षांच्या कालावधीपासून निरंतर अखंड सुरू आहे. यावेळी श्री रेणुकादेवी संस्थानचे विश्वस्त, पुजारी यांची उपस्थिती होती.

### पुनमताई पवार लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

**उमरी** -सद्यस्थितीत अभेद्य अशी राजकीय पार्श्वभूमी असतानाही




सत्तेपेक्षा सेवेला एक आई समान प्राधान्य देणाऱ्या, अभियंत्याची अफलातून दूरदृष्टी असलेल्या, तेवढ्याच संवेदनशील हृदयाच्या व समाजसेवाच आपला जीवन धर्म मानत त्या आपल्या कार्याद्वारे सत्यात उतरणाऱ्या आमदार राजेश पवार यांच्या सुविद्य पत्नी, माजी जिल्हा परिषद सदस्या, तथा नांदेड दक्षिणच्या महिला आघाडीच्या भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा अध्यक्षा सौ.पुनमताई पवार यांना नुकताच लंडन येथे लोकमत महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास लोकमत समूहातील उच्चस्तरीय अधिकारी, सुप्रसिध्द सिने अभिनेता सुनील शेट्टी, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत सदरील पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे अख्ख्या नायगाव विधानसभा मतदारसंघात त्यांच्या चाहत्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून त्यांच्यावर कौतुकांचा व अभिनंदननाचा पाऊसच पडत आहे.

### पूरग्रस्तांना नाणीज धामकडुन मदत


**बाऱ्हाळी** -पूरग्रस्त हसनाळ येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य नाणीज धाम यांच्या सेवा समीती च्या वतीने ग्रामस्थांना साडी,




ब्लँकेट, तांदूळ, तेल या रेशन किट सह दूपारच्या जेवनाची व्यवस्था करण्यात आली. अचानक आलेल्या लेंडी नदीच्या महापूराने हा हा कार माजवला चार गावे अक्षरशः पाण्यात बूडाली सर्व काही सोडून लोक सूरक्षीत ठिकाणी आसरा घेतला. त्यामुळे त्यांच्या कडे अंगावरील कपड्याशिवाय काहीच उरले नाही हे पाहता अनंत विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थान नाणीज च्या सामाजिक उपक्रम अंतर्गत नांदेड दक्षिण व मूखेड व राजूरा सेवा समीती च्या वतीने आपदग्रस्त लोकांना अंगावर ओढण्यासाठी ब्लँकेट ,साडी ,जेवनासाठी तांदूळ, तेल या सारख्या अत्यावश्यक वस्तू व ग्रामस्थांना दूपारच्या जेवनासाठी खिचडी वाटप करण्यात आली. यावेळी नांदेड दक्षिण चे निरीक्षक बालाजी कोठारे, जिल्हा अध्यक्ष शामभाऊ नागलगावे,मष्णाजी पैलवार, सचिव राम माचिनवाड,महिला अध्यक्षा सौ.पूजाताई उमाटे ,दत्तात्रय बेंजलवार ,संजीवनी प्रमुख शंकर पा.नकाते आदी उपस्थित होते.

### डीवायएसपी दीपककुमार यांना राष्ट्रपतीपदक जाहीर

**कंधार** -कंधार तालुक्यातील श्री क्षेत्र उमरज येथील भूमिपुत्र सेलू (जि. परभणी) येथील उपविभागीय पोलिस अधिकारी दीपककुमार चुडामन



वाघमारे यांना पोलिस दलात केलेल्या उत्कृष्ठ कार्याबद्दल राष्ट्रपती पदक जाहीर झाले. यानिमित्त पोलिस अधीक्षक कार्यालय परभणीच्यावतीने परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याहस्ते स्वातंत्र्य दिनी त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. डीपीडीसी हॉल जिल्हाधिकारी कार्यालय परभणी येथे पार पडलेल्या सोहळ्यात परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे, परभणीचे पोलीस अधीक्षक परभणी रवींद्रसिंह परदेशी, माजी मंत्री खासदार फौजिया खान आदी मान्यवर उपस्थित होते.

# आगामी सण सोहार्दपूर्ण वातावरणात, एकोप्याने, शांततेत साजरे करावे: अबिनाश कुमार

**तभा वृतसेवा**
**हदगाव , दि. २१ ऑगस्ट -**

आगामी येणारे सर्वच सण शांततेत, सौहार्दपूर्ण वातावरणात कायद्याच्या चौकटीत राहून साजरे करावे व एक गाव गणपती याही पुढे जाऊन एक मोहल्ला एक गणपती हे उपक्रम राबवून समाजामध्ये एक चांगला संदेश देण्याचे काम हदगाव - हिमायतनगर तालुक्यातील जनतेने करावे अशी अपेक्षा व्यक्त करत आदर्श तालुका म्हणून हदगाव - हिमायतनगर नावलौकिक व्हावी असे विधान व विश्वास हदगाव येथे शांतता समितीची बैठक व पुरस्कार वितरण सोहळ्यात नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले.

सदरील बैठकीस माजी खा. सुभाषराव वानखेडे, आ. बाबुराव कदम कोहळीकर, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे, उपकार्यकारी अभियंता संतोष पडघणे, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, कृष्णा पाटील आष्टीकर ,किशनराव पौळ, मुंगाजी काकडे, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी संजीवन मिरकले, सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पोलीस पाटील, विविध मंडळाचे अध्यक्ष , कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना अबिनाश कुमार म्हणाले की, डीजेची यंदा कोणतीही प्रकारची परवानगी राहणार नाही. डीजे न लावता नागरिकांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून सन उत्सव शांततेत साजरा करण्यावर भर द्यावा. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे पोलीस प्रशासन नेहमीच दक्ष असून नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये. असामाजिक तत्त्वांना हाताळण्यात आम्ही सक्षम असून काहींना जिल्ह्यातून आम्ही हद्दपार देखील केलेले आहेत . जसा हदगाव चा पूर्वीपार इतिहास शांततेचा राहिलेला आहे अशा प्रकारचा पुढे देखील इतिहास राहावा व आपण स्वतःहून शांतता स्थापित करण्यात पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे देखील म्हणाले. यावेळी माजी खा.सुभाषराव वानखेडे, आ.कोहळीकर व इतर मान्यवरांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

# पूरग्रस्तांच्या मदतीसाठी रामदास पाटील मित्रमंडळ सरसावले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ ऑगस्ट -**

मुखेड तालुक्याी ढगफुटी सदृष्य पाऊस झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. या पूरग्रस्तांना विविध स्तरातुन मदत होत असून या मदतीसाठी रामदास पाटील सुमठाणकर यांच्यासह मित्र मंडळ देखील सरसावले असून मागील दोन दिवसापासून पूरग्रस्तांना त्यांच्याकडून मदत वाटप करण्यात येत आहे.

मुखेड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकांचे बळी गेले, पशुधन दगावले. संसार उघड्यावर पडल्यामुळे नागरीक हवालदिल झाले आहत. या पूर परीस्थितीची पाहणी तसेच पूरग्रस्ताना धीर देणयासाठी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार तुषार राठोड, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, राष्ट्रावदीचे रामदास पाटील सुमठाणकर यांच्यासह विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी प्रशासकीय




अधिकारी यांनी पुरग्रस्त भागांची पाहणी केली. परीस्थीतीवर मात मरण्यासाठी, पुरग्रस्तांना आधार देण्यासाठी विविध ठिकाणाहून मदतीचा हात पुढे करण्यात येणार येत आहे याच अनुषंगाने रामदास पाटील सुमठाणकर मित्र मंडळ देखील मदतीसाठी सरसावले असून अतीवृष्टीची केवळ पाहणी न करता रामदास पाटील सुमठाणकर यांनी मित्रमंडळींचा सहकाऱ्याने मुखेड तालुक्यातील मुक्रामाबाद भागातील, मुक्रमाबाद, भिंगोली, भेंडेगाव,हसनाळ, रावणगांव, मारजवाडी,रावी, सावळी,या व अन्य गावात अन्न धान्य वाटप करण्यात येत असुन पूरग्रस्तांना धीर देण्यात येत आहे. प्रदीप पाटील, बालाजी ढोसने, बालाजी पाटील, पप्पू रावणगांवकर, केरूरकर पाटील, दिनेश आवडके , सद्दाम कोतवाल, ज्ञाणेश्वर सुरणार, विजय राठोड, निळकंट पाटील, राम साळवेश्वर, सदा घाले, नितीन टोकलवाड, तुकाराम सूडके, रमाकांत पाटील,दिनेश पाटील, श्रीकांत काळे, अनिल बल्लेवर, प्रसाद देवणे, जलील भाई, चंद्रशेकरं पाटील, बळवन्त पाटील, सुधाकर सुरणरं असे अनेक जण या सेवेत गुंतले आहेत. कोरोना संकट असो की अतिवृष्टी रामदास पाटील सुमठाणकर मित्र परिवार सेवेत निरंतर खंबीर असल्याचे दाखवुन दिले आहे.

# तात्काळ पंचनामे करा, प्रस्ताव सादर करा; निधीची कमतरता पडू देणार नाही: आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**लोहा , दि. २१ ऑगस्ट -**

तालुक्यातील मागील दोन तीन दिवसांपूर्वी मुसळधार पावस झाला नदी नाल्याना पूर आला. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. जनावरे दगावली पुरामुळे वाहतुक ठप्प झाली शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले या पार्श्वभूमीवर

तहसील कार्यालयात आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी तालुक्यातील पूर परिस्थिती चा आढावा घेतला. तात्काळ पंचनामे करा प्रस्ताव पाठवा, निधीची कमरता भासणार नाही असा विश्वास त्यांनी व्यक करत तालुका प्रशासनाला सूचना दिल्या.

आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी लोहा तालुक्यातील अतिवृष्टी व उदभवलेल्या आपत्ती व्यवस्थापन परिस्थितीचा आढावा लोहा तहसील कार्यालयात गुरुवारी (२१ ऑगस्ट) दुपारी एक वाजता घेतला . बैठकीस माणिकराव मुकदम माजी जिल्हा परिषद सदस्य प्रविण पाटील चिखलीकर, तहसीलदार विठ्ठल परळीकर, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता मोहन पवार, जि.प. उपअभियंता शिवाजी राठोड, नायब तहसीलदार मोकले, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, केशवराव मुकदम, माजी सभापती आनंदराव शिंदे, उपसभापती नरेंद्र गायकवाड, खुशाल पाटील,पांगरिकर दत्ता वाले, करिम शेख,वन विभागाचे वनपाल ज्ञानेश्वर हाकदळे , दिघे, यांच्यासह पाटबंधारे, सामाजिक वनीकरण, फॉरेस्ट आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

आमदार चिखलीकर यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला तालुक्यातील सहाही मंडळात अतिवृष्टी झाली आहे शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून अहवाल सादर करावेत. पूरामुळे नुकसान झालेल्या रस्ते व पुलांची पाहणी करून अंदाजपत्रक तयार करा . या कामासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही.असा विश्वास शेतकरी व संबंधित विभागास दिला. आरोग्य विभागाकडे विशेषतः लक्ष वेधून त्यांनी सांगितले की, पूरग्रस्त भागात औषधांची कमतरता भासू नये. जर तुटवडा असेल तर तातडीने पत्र सादर करावे. आवश्यक औषधे उपलब्ध करून देण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी मी स्वतः संपर्क साधणार आहे आरोग्य यंत्रणा सतर्क असली पाहिजे हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही असा इशारा त्यांनी या विभागाला दिला.



**कंधार- मुंबईत मुसळधार पाऊस असतानाही हजारो शिवसैनिक व कार्यकर्त्यांसह प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांचा प्रवेशसोहळा मातोश्री येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे ह्यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात पक्षप्रमुखांनी शिवबंधन बांधून त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी शिवसेना नेते सचिव विनायक राऊत, शिवसेना नेते विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, उपनेते बबन थोरात, लातूर संपर्कप्रमुख रोहिदास चव्हाण, लातूर जिल्हाप्रमुख बाळाजी रेड्डी, उपतालुकाप्रमुख भालचंद्र नाईक, लोहा-कंधार विधानसभा समन्वय गणेशभाउ कुंटेवार, पंचायत समिती सदस्य नवनाथ बापू चव्हाण, तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव, लोहा तालुकाप्रमुख भिमराव पाटील शिंदे, तालुकासंघटक पंडितराव देवकांबळे, शहरप्रमुख अतुल पापीनवार यांची प्रमुख उपस्थिती होती.**

# लेंडी बुडीत क्षेत्रातील दुर्घटनेवर शिवसेनेचा संताप; तेलंगणाच्या मुख्यमंत्र्याकडे आर्थिक मदतीची मागणी

**तभा वृतसेवा**
**देगलूर , दि. २१ ऑगस्ट -**

देगलूर - मुखेड -बिलोली तालुक्यातील लेंडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील दुर्घटनेत गावकऱ्यांचे मोठे हाल झाले असताना शासन प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे १२ जणांचा बळी गेला. शेकडो जनावरे दगावली, शेतपिके व घरे वाहून गेली, शेतकऱ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. तरीसुद्धा महाराष्ट्र शासन व स्थानिक आमदार गप्प बसले असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने थेट तेलंगणाच्या मुख्यमंत्र्याकडे धाव घेत तातडीच्या आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

हैदराबाद येथे नांदेडचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत



रेड्डी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी शिवसेनेचे पाटील यांनी सांगितले की, लेंडी प्रकल्पातील ६० टक्के पाणी तेलंगणाचा वाटा असल्याने या आपत्तीत बाधित कुटुंबांना, शेतकऱ्यांना, मजुरांना व गोरगरीबांना तेलंगणा सरकारकडून तातडीने आर्थिक मदत जाहीर व्हावी.

प्रशासनाने कुठलीही पूर्वसूचना न देता बळजबरीने पोलिस बंदोबस्तात धरणाच्या गळभरणीचे काम करून गेट बंद केले, त्यामुळे मध्यरात्री गावात पाणी शिरले आणि ही दुर्घटना घडली. ही नैसर्गिक आपत्ती नसून प्रशासनाने घडवून आणलेली मानवनिर्मित आपत्ती आहे, असा ठाम आरोप बुडीत क्षेत्रातील नागरिकांसह शिवसेनेने केला आहे.

दुर्घटनेनंतर तातडीचा उपाय म्हणून प्रशासनाने टीनशेडच्या निवाऱ्याची सोय केली असली, तरी तो निवारा निकृष्ट दर्जाचा असून साध्या प्राथमिक गरजासुद्धा तिथे उपलब्ध नाहीत. वीज, पाण्याची व्यवस्था नाही; शिवाय टीनशेड्स वापराआधीच गळायला लागले आहेत. या संपूर्ण कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप सुद्धा ग्रामस्थ आणि शिवसेनेने केला आहे.

निवेदन सादरीकरणावेळी नांदेडचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण, श्रीनिवास चव्हाण, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर, शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, मुखेडचे तालुका प्रमुख उमेश पाटील आडलूरकर,देगलूर शिवसेना प्रवक्ता सरपंच बालाजी चोपडे खुतमापुरकर, मुखेड शिवसेना उपतालुकाप्रमुख अनिल पाटील राजुरकर, राहुल ठाकुर आदी उपस्थित होते.

या निवेदनाच्या प्रती माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, नांदेडचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण, संपर्कप्रमुख बबनराव थोरात, जिल्हा प्रमुख बबनराव बारसे, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. दरम्यान प्रशासनाच्या बेफिकिरीवर संताप व्यक्त करत, ही सामान्य जनतेला भेडसावणारी मानवनिर्मित आपत्ती असून बाधितांना न्याय मिळाल्याशिवाय शिवसेना शांत बसणार नाही, असा इशाराही शिवसेनेने दिला आहे.